दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची
सोमवार, दि. १३ जुलै २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या ९ पायाभूत सुविधांचे लोकार्पण

## रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उड्डाण पुलांचे बांधकाम – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- सुरक्षित व जलद दळणवळण सुविधांच्या बांधकामांना प्राधान्य
- ४ आरओबी, ४ सबवे व १ अंडरब्रिजचे लोकार्पण



**नागपूर (दै. संध्या)**

राज्यातील नागरिकांना सुरक्षित, कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित दळणवळण सुविधा उपलब्ध करून देतानाच रेल्वे फाटकाअभावी होणारे अपघात टाळण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उड्डाण पुलांच्या बांधकामांना प्राधान्य देण्यात येत असून, रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.

वर्धमाननगर येथे रेल्वे क्रॉसिंगवर चार पदरी रस्ता उड्डाण पूल तसेच राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या ९ महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड [महारेल] यांनी विकसित केलेल्या या प्रकल्पाच्या लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी होते. यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर, महापौर श्रीमती निता ठाकरे, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी, महारेलचे महाव्यवस्थापक राजेशकुमार जयस्वाल, दयाशंकर तिवारी, महानगरपालिकेचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेल्वे फाटकाअभावी दरवर्षी २१ हजार लोकांचा मृत्यू होत असल्यामुळे रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात ५२४ रेल्वे फाटकांची आवश्यकता असून, त्यापैकी १० हजारपेक्षा जास्त दळणवळण असलेल्या १२१ फाटकांसोबतच इतरही १४५ रेल्वेवरील पुलांच्या बांधकामांना मान्यता दिली असून, हे संपूर्ण काम येत्या तीन वर्षांत महारेलतर्फे पूर्ण करण्यात येणार आहे. रेल्वे प्रकल्पासंदर्भातील बांधकामासाठी महारेलची स्थापना केल्यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे.

नागपूरसह मुंबईतील अतिशय कठीण पुलांच्या बांधकामांचे नियोजनबद्ध काम जलद गतीने पूर्ण करण्यात आले आहे. महारेलने नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून, यासाठी पेटंटसुद्धा मिळविले आहे. कामाची गती व कमी खर्चात कामाचा दर्जा राखत पायाभूत सुविधांची कामे पूर्ण केल्याचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला.

नागपूर शहराच्या तसेच रस्त्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे सुरू असल्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या असून, मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती होत आहे. त्यामुळे सामाजिक व आर्थिक विकास होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. भगवान संभनाथ चौक ते डिप्टी सिग्नल मार्ग या रेल्वे ओव्हरब्रिजला माजी उपमहापौर बाहरीनबाई सोनबोईर यांचे नाव देण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच पारडी येथील उड्डाण पुलासोबतच येथील व्यावसायिकांसाठी आधुनिक भाजी मार्केट तसेच स्पोर्ट क्लब बांधण्यात येणार असल्याचे सांगितले. या प्रकल्पाच्या १५० कोटी रुपयांच्या खर्चापैकी ४० कोटी रुपयांचा निधी एनएचएआयतर्फे देण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. पूर्व नागपूर परिसरात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्या असून, कचऱ्यापासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्प सुरू होत आहे. महारेलतर्फे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे सुरू असून, ती अत्यंत जलद गतीने पूर्ण होत आहेत. मेट्रो प्रकल्पामुळे नागपूरचा गौरव वाढल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार कृष्णा खोपडे यांनी विविध विकास कामांची माहिती दिली. महारेलचे महाव्यवस्थापक राजेशकुमार जयस्वाल यांनी महारेलतर्फे राज्यात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. यामध्ये अमरावती, सातारा, नाशिक, सांगली, नागपूर, चंद्रपूर जिल्ह्यांतील तीन रोड ओव्हरब्रिज, ४ सबवे आणि एक रोड अंडरब्रिज या प्रकल्पांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पांवर ४८४ कोटी रुपये खर्च झाला असून, नागपूर येथील दोन प्रकल्प केंद्रीय रस्ते व पायाभूत सुविधांतर्गत पूर्ण करण्यात आले आहेत. सात प्रकल्प रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या ५०:५० खर्च वाटपाच्या तत्त्वावर पूर्ण करण्यात आले आहेत. जितेंद्रकुमार शर्मा यांनी आभार मानले.

## पानशेत पूरग्रस्त सोसायट्यांचे प्रश्न ६५ वर्षांनंतरही प्रलंबित; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**पुणे (दै. संध्या)**

१२ जुलै १९६१च्या महापुराला ६५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर पानशेत पुरामुळे बाधित झालेल्या अनेक वसाहती आणि मागासवर्गीय गृहनिर्माण सोसायट्यांचे प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याची खंत सहकारनगर भाग १, २, पद्मावती, सेनादत्त सोसायटी नवी पेठ, सेनापती बापट रोड, आदी पूरग्रस्त सोसाट्यांच्या सभासदांनी व्यक्त केली आहे. अनेक वर्षांपासून विविध शासकीय कार्यालयांमध्ये पाठपुरावा करूनही आमचे प्रश्न सुटलेले नाहीत. यामुळे प्रशासनाने विशेष मोहीम राबवून सर्व प्रकरणांचा एकत्रित आढावा घ्यावा आणि स्वतंत्र पूर्णवेळ प्रशासकीय अधिकारी नेमावा, अशी मागणी करण्यात येत आहे. १०३ पैकी ९० सोसायटीचे प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. केवळ १३ सोसायट्यांच्या मालकी हक्काचा प्रश्न मार्गी लागला आहे. उर्वरित सोसायट्यांचे काम संतगतीने सुरू असल्याची व्यथा मांडली. १९६१ च्या पुरात शहरातील हजारो घरे उद्ध्वस्त झाली, अनेकांचा जीव गेला आणि लाखो लोकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. तर अनेक पूल, रस्ते, दुकाने आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. १९६१ च्या पुरानंतर अनेक कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र, काही वसाहती आणि गृहनिर्माण सोसायट्यांशी संबंधित मालकी हक्क, जमिनीच्या नोंदी, विकास परवानग्या, मूलभूत सुविधा आणि इतर प्रशासकीय बाबी आजही रखडलेल्या आहेत.



त्यामुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूरग्रस्त रहिवासी काका लडकत म्हणाले, पानशेत पूरग्रस्त सोसायटीमधील ९९ वर्षे भाडेत्तवावर राहणाऱ्या कुटुंबांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीला या प्रश्नांचा फटका बसत आहे. वारंवार निवेदने देऊनही यावर ठोस निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत भाडेकरूचेही प्रश्न तातडीने निकाली काढावेत. यावर अनेकदा उपनिबंधकांनी प्रशासनाकडे पाठपुरवा केला आहे. ६५ वर्षांनंतर तरी न्याय मिळावा. दत्तवाड येथे १३ सोसायटी प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. प्रॉप्रटी कार्डवर वारसदार नोंदी होत नाही. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे आणि वारस नोंदणी करावी.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी घेतले माऊलींचे दर्शन

## बळीराजाच्या सुखासाठी पांडुरंगाचरणी साकडे



दर्शनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वारकऱ्यांबरोबर स्नेहभोजन देखील घेतले. वारीच्या धार्मिक वातावरणात सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीमुळे राजकीय चर्चांनाही उधाण आले असून, वारकरी परंपरेशी कायम असलेली जवळीक अधोरेखित करण्याचा प्रयत्न त्यांनी या भेटीतून केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**नीरा (दै. संध्या)**

संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा आज पुरंदर तालुक्यातील सासवड येथे मुक्कामी असताना राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पालखी सोहळ्याला भेट देत माऊलींच्या पादुकांचे भावपूर्ण दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी वारकरी परंपरा, दिवंगत अजितदादा पवार यांचे वारकऱ्यांशी असलेले भावनिक नाते आणि राज्यातील शेतकऱ्यांसाठी चांगल्या पावसाची गरज यावर भाष्य केले.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, माऊलींच्या पालखीचे दर्शन घेण्याची ही अनेक वर्षांची परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज या दोन्ही पालखी सोहळ्यांच्या प्रस्थानावेळी त्या नियमित उपस्थित राहतात. वारकरी संप्रदायाशी अजितदादा पवार यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भावनिक नाते होते. प्रत्येक वारकऱ्याला सुखकर दर्शन मिळावे, पालखी मार्ग अधिक चांगले व्हावेत, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. आज अनेक पालखी मार्ग सुधारले असून उर्वरित मार्गांवरही काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवंगत अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, त्यांच्या जाण्यानंतर सर्वांच्याच भावना वेगळ्या आहेत. मात्र वारकरी संप्रदायाची श्रद्धा आणि पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ आजही तितकीच कायम आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी एकाच भावनेने वारीत सहभागी होत असून, प्रत्येकाला आपल्या पांडुरंगाचे समाधानकारक दर्शन व्हावे, हीच सर्वांची इच्छा असते.

यंदाच्या पावसाबाबत बोलताना त्यांनी अल निनोच्या संकटाचा उल्लेख केला. काही दिवसांपूर्वी राज्यात अतिवृष्टीमुळे रेड अलर्टची परिस्थिती निर्माण झाली होती आणि काही दुर्दैवी घटनाही घडल्या. मात्र पालखी प्रस्थानाच्या काळात दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे वारकऱ्यांचा प्रवास सुरळीत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तथापि, राज्यातील काही भागात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करताना त्यांनी, "माझा बळीराजा सुखी झाला तर संसार सुखी होईल. त्यासाठी चांगला पाऊस पडणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून पांडुरंगाकडे शेतकऱ्यांसाठी आणि चांगल्या पावसासाठी प्रार्थना करूया," असे भावनिक आवाहन केले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




# संत सोपानकाका महाराजांच्या पालखीचे प्रस्थान

**सासवड (दै. संध्या)**

“माझिया वडिलाची मिरासिगा देवा, तुझी चरणसेवा बा पांडुरंगा " हा अभंग होऊन सकाळी ठीक १२ . ३० वाजता संत सोपानकाकांच्या पालखीची एक मंदिर प्रदक्षिणा होऊन पुर्वेकडील दरवाजातून हा सोहळा बाहेर पडला. यावेळी हजरो भाविकांनी माउली व सोपानकाकांचा जयघोष केला. सासवडकर ग्रामस्थांनी पालखी खांद्यावर घेऊन सासवड गावातून मिरवत जेजुरी नाक्यापर्यंत आणली त्याप्रसंगी रस्त्याच्या दुतर्फा हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. टाळ - मृदुंगाच्या गजरात, ग्यानबा - तुकारामांच्या जय घोषात, भगव्या पताकांच्या गर्दीत, हजारो वैष्णवांच्या साक्षीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचे धाकटे बंधू संत सोपानकाका महाराजांच्या पालखीचे आषाढवारीसाठी रविवारी ( दि. १२) सासवड वरून उत्साही वातावरणात पांगारे गावाकडे प्रस्थान झाले.




हजारो भाविकांची उपस्थिती

दरम्यान, रविवारी बारस व सोपानदेवांच्या पालखीचा प्रस्थान दिन असल्याने मंदिरात पाहटे ४ वाजता काकड आरती, महापूजा व धार्मिक विधी संपन्न झाले. त्यानंतर पाहाटे ५ पासून मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. संत सोपानकाकांच्या संजीवन समाधी दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. सकाळी ११ वाजता प्रस्थान सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्वप्रथम मनाच्या दिंड्यांना मंदिरात घेण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सर्व दिंडी प्रमुखांचे मानाचे अभंग संपन्न झाले. याच दरम्यान मानकरी केंजळे महाराज, देवस्थानचे प्रमुख ॲड त्रिगुण गोसावी, गोपाळ गोसावी, श्रीकांत गोसावी यांनी देवघरातून सोपानकाकांच्या पादुका आणून विणामंडपातील पालखीमध्ये विधिवत स्थानापन्न केल्या. त्यानंतर सोपानदेव देवस्थान ट्रस्ट, संत सोपानकाका सहकारी बँक व सासवड नगरपालिका यांच्या वतीने सर्व दिंडी प्रमुखांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला. सोपानकाका बँकेच्या वतीने माजी अध्यक्ष आणि पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते प्रत्येक दिंडीचा सत्कार करण्यात आला. दरम्यान संत सोपानकाकांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याप्रसंगी मंदिरात पंढरपुर, आळंदी, देहू, मुक्ताईनगर, त्रंबकेश्वर आदी ठीकानाच्या देवस्थानांचे प्रतिनिधी व दिंडी प्रमुख, सासवडचे सर्व नगरसेवक, ग्रामस्थ व हजारोंच्या संखेने भाविक उपस्थित होते. पालखी सोहळ्याला निरोप देण्यासाठी जेजुरी नाक्यावर माजी आमदार संजय जगताप व हजारो सासवडकर नागरिक उपस्थित होते. पालखी मार्गावर बँक ऑफ इंडियाच्यावतीने फराळाचे वाटप, स्व एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने सरबत वाटप करण्यात आले. पालखी समवेत १२६ दिंड्या आहेत. रथासाठी सोरटेवाडीच्या केंजळे परिवाराच्या बैल जोडीचा मान असून नितीन कुलकर्णी यांचा नगारावाहन आहे. अंजनगावचे परकाळे कुटुंबातील अश्व राम आणि राजा पालखीसमवेत मार्गक्रमण करीत आहेत. संत सोपानकाका बँकेच्या वतीने चांदीचा रथ, दररोजची फुलांची सजावट, पाण्याचा टँकर, रुग्णवाहिका, डॉक्टर व औषधे दरवर्षी देण्यात येतात. दुपारी २ च्या दरम्यान जेजुरी नाक्यावर ग्रामस्थ आणि हजारो भाविकांनी पालखीला निरोप दिल्यानंतर हा सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. संत सोपानकाका महाराजांच्या पालखीचा पांगारे या गावी पहिला मुक्काम आहे. दरम्यान, संत सोपानकाका महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पाठोपाठ संत योगिराज चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळ्याचेही प्रस्थान दुपारी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरातून मानाचे अभंग, आरती होऊन हरिनामाच्या गजरात आणि २४ दिंड्यांसह वारकऱ्यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे झाले. याप्रसंगी माजी आमदार संजय जगताप, सोहळ्याचे प्रमुख जनार्दन वाबळे, बापूसाहेब जगताप आणि मुख्य चोपदार शशिकांत जगताप उपस्थित होते.

# १२ कोटी, ३ बीएचके फ्लॅट न दिल्यामुळेच सुनेचे खोटे आरोप

## यामागे षडयंत्र! विनायक राऊतांचा सून गिरीजा राऊत यांच्यावर प्रतिआरोप

**मुंबई (दै. संध्या)**

माजी खासदार विनायक राऊत आणि त्यांच्या कुटुंबावर सून गिरीजा राऊत यांनी केलेल्या गंभीर आरोपांनंतर आता राऊत विरुद्ध सून असा थेट वाद पेटला आहे. माजी खासदार विनायक राऊत यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावत सुनेने 12 कोटी रुपये मागितल्याचा आरोप केला आहे, तर दुसरीकडे गिरीजा राऊत यांनीही सासरच्यांनी फसवणूक आणि छळ केल्याचा पुनरुच्चार केला आहे.



शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांचे कुटुंब एका मोठ्या वादात सापडले आहे. विनायक राऊत यांची सून गिरीजा राऊत यांनी पती, सासऱ्यांसह संपूर्ण कुटुंबाविरोधात ठाण्यातील कापूरबावडी पोलिस ठाण्यात गंभीर तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून माजी खासदार विनायक राऊत, त्यांचे नगरसेवक पुत्र गितेश राऊत, सासू शामल राऊत यांच्यासह एकूण 7 जणांविरुद्ध कौटुंबिक छळ आणि जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजी खासदार विनायक राऊत यांनी सुनेचे सर्व आरोप खोटे असल्याचे सांगत म्हटले आहे की, गिरीजा राऊत गेल्या 3 वर्षांपासून पती गितेश राऊत यांच्यासोबत राहत नाहीत. जर 2018 ते 2022 दरम्यान घरात अघोरी कृत्य केले जात होते आणि त्यावेळी गिरीजाचे आई-वडीलही सोबत होते, तर त्यांनी तेव्हाच तक्रार का केली नाही? इतकी वर्षे गप्प राहून 2026 मध्ये अचानक तक्रार दाखल करण्यामागे नक्कीच काहीतरी षडयंत्र आहे. आम्ही कोणत्याही प्रकारचे अघोरी उपाय केलेले नाहीत आणि या आरोपांचे आम्ही पूर्ण खंडन करतो, तसेच या प्रकरणी आम्ही न्यायालयात गेलो आहोत, असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

विनायक राऊत यांनी पैशांच्या मागणीवरून सुनेवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले की, गिरीजा हिने आमच्याकडे तब्बल 12 कोटी 50 लाख रुपयांची मागणी केली होती. यामध्ये 5 कोटी रुपये रोख, मुंबईत 3 बीएचके टेरेस फ्लॅट, एक आलिशान कार आणि दर महिन्याला 2 लाख रुपये घरखर्च मिळावा, अशी तिची मागणी होती. आम्ही ही अवाजवी मागणी मान्य केली नाही, म्हणूनच केवळ आम्हाला बदनाम करण्यासाठी आणि दबाव आणण्यासाठी तिने आता हे खोटे आरोप करून प्रकरण बाहेर काढले आहे.

विनायक राऊत यांच्या आरोपांवर प्रत्युत्तर देताना सून गिरीजा राऊत म्हणाल्या की, राऊत कुटुंबाने लग्नापूर्वी सर्व खोट्या गोष्टी सांगून आमची फसवणूक केली. लग्नानंतर संपूर्ण चित्र वेगळे होते आणि गेल्या 7 वर्षांपासून त्यांनी माझा प्रचंड छळ केला. राऊत कुटुंबाची मोठी राजकीय पार्श्वभूमी असल्याने आणि आज ना उद्या परिस्थिती सुधारेल, सुखाने संसार होईल या आशेने मी इतकी वर्षे सर्व काही सहन केले आणि कुठेही तक्रार केली नव्हती. मी त्यांच्याकडे कोणतीही संपत्ती किंवा पैसे मागितलेले नाहीत. त्यांनी माझा जो छळ केला, तो लपवण्यासाठीच ते आता खोटे बोलत आहेत. अघोरी कृत्य म्हणजे वेगवेगळ्या बाबांकडे मला नेत होते, कोणी जिंवत कोंबडे माझ्यावरून उतरवत होते तर कोणी कणकेच्या भावल्या करत डोक्यावरचे केस तोडून उतारे करत होते. उदी प्यायला देणं. मुलगा शारीरिक संबंध करण्यास अक्षम आहे हे लपवण्यासाठी त्यांनी हे सर्व केले.

# संपादकीय

## आजचं चित्र काय आहे?

सरकारी निवासस्थानांचा राजकीय पक्षांकडून अनिश्चित काळ वापर करणं योग्य नसल्याचं नमूद करून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले होते. त्यास १४ वर्षं उलटल्यानंतरही आजचं चित्र काय आहे?

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून ल्यूटियन्स दिल्लीतल्या '२४ अकबर रोड' या सरकारी बंगल्याचं कोणतंही भाडं मिळालेलं नसून या पक्षानं नवीन 'इंदिरा भवन' कार्यरत झाल्यावरही हाच बंगला ताब्यात ठेवल्याचं ताजं वृत्त, दिल्लीतले सरकारी बंगले, या मुद्द्याकडे नव्यानं पाहण्यास प्रवृत्त करतं. काँग्रेसकडे या बंगल्याची थकबाकी किती आहे, याचा हिशेब करायला केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या इस्टेट संचालनालयाला १३ वर्षं उलटल्यावरही वेळ मिळाला नसावा, हेही माहितीच्या अधिकाराखाली दिलेल्या उत्तरातून समोर आलंय. भाडेथकबाकीची ही बाब प्रत्यक्षात ल्यूटियन्स दिल्लीतल्या सरकारी बंगल्यांमध्ये दशकानुदशके चालत आलेल्या राजकीय पक्षांच्या मुख्यालयांचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतरही पूर्णपणे न सुटलेल्या प्रश्नाचा भाग आहे. दोन्ही प्रमुख पक्षांसह अनेक राष्ट्रीय पक्षांनी दीनदयाळ उपाध्याय मार्ग परिसरात नव्या मुख्यालयांत स्थलांतर केलं असलं तरी जुन्या सरकारी बंगल्यांचा मोह, त्यांवरील ताबा, भाडेकरार, थकबाकी आणि सरकारी कारवाई यांबाबत अजूनही अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

ब्रिटिशांनी लाल किल्ला, कुतुबमिनार वगैरे मुघलकालीन इमारती उद्ध्वस्त न करता ल्युटियन्स दिल्ली वसवली. ही दिल्ली म्हणजे अख्ख्या देशाचं सत्ताकेंद्र. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राष्ट्रीय पक्षांना या भागातील सरकारी बंगले मुख्यालय म्हणून वापरण्यासाठी देण्यात आले. अनेक पक्षांची राष्ट्रीय कार्यालयं सरकारी बंगल्यांतूनच चालतात. काळाच्या ओघात सार्वजनिक मालमत्तेचा राजकीय पक्षांकडून वापर हा वादाचा विषय झाला. गेल्या १२ वर्षांत विशंवभरदास रस्ता परिसरात नद्यांच्या नावानं उभारलेली नवी खासदार निवासस्थानं कार्यरत झाल्यावर यातल्या अनेक बंगल्यांत सत्ता वर्तुळातल्या लोकांनी बस्तान बसवलंय. सुमारे शतकापूर्वी उभारलेल्या या जुन्या बंगल्यांची देखभाल दिवसेंदिवस खर्चिक होत आहे. वारसा संवर्धनाच्या नियमांमुळे त्यात मोठे बदल करणंही कठीण ठरतं. सुमारे दशकापूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे दिल्लीत आले होते, त्याच्या अगदी आधी खासदार संजय राऊत यांच्या फिरोजशहा रस्त्यावरच्या जुन्या बंगल्यात गळती होत होती! आधुनिक सुरक्षा व्यवस्थेसाठी आवश्यक बदल करणंही अनेकदा अवघड जातं. सरकारी मालमत्तेच्या वापराबाबत नियम समान असावेत, अशी मागणी सातत्याने होत असते. पण तळे राखील तो पाणी चाखील, हीच म्हण इथंही लागू पडते. सरकारी यंत्रणेचा दावा आहे की, '२४ अकबर रोड'च्या मासिक भाड्यापैकी काही देयकं प्रलंबित आहेत; तर काँग्रेसनं ह दावा फेटाळताना हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं स्पष्ट केलं आहे. अनेक राजकीय पक्ष व नेते सातत्यानं 'ल्युटियन्स दिल्ली', 'खान मार्केट गँग', 'एलिट राजकारण', 'सत्तेचा अभिजन वर्ग' यांच्यावर टीका करतात. वास्तवात याच पक्षांची दिल्लीतील प्रमुख कार्यालये ल्यूटियन्स परिसरात किंवा त्याच्या अगदी जवळ आहेत. ही वस्तुस्थिती भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा विरोधाभासही अधोरेखित करणारी. कारण राजकारणात विचारधारा जितकी महत्त्वाची तितकीच महत्त्वाची असते सत्ता आणि निर्णयप्रक्रियेच्या केंद्राशी असलेली भौगोलिक जवळीक. संसदेत प्रश्न उपस्थित करणं, मंत्रालयांशी संपर्क ठेवणं यासाठी मंत्री-खासदारांच्या ओएसडी-पीए मंडळींना श्रम पडू नयेत म्हणूनही ही व्यवस्था असावी. सर्वोच्च न्यायालयानं सरकारी निवासस्थानांचा राजकीय पक्षांकडून अनिश्चित काळ वापर करणं योग्य नसल्याचं नमूद करून केंद्र सरकारला पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले त्याला १४ वर्षं उलटली. नवीन मुख्यालयं सुरू झाल्यानंतरही जुने सरकारी बंगले पूर्णपणे सरकारच्या ताब्यात परत न करणं, हे जर दोन्ही प्रमुख पक्षच करत असतील तर इतरांबाबत काय बोलावं...!

## संस्कृत सुभाषित

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ॥
अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

## गुरु वचन

### भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह – स्वामी देवेंद्रानंदगिरी

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दु:खाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## उपदेशकथा

### मातृभाषेचे महत्त्व

एकदा सरदार वल्लभभाई पटेल आपला मुलगा, सून व नातूसह महात्मा गांधींना भेटण्यास गेले होते. ते जेव्हा गेले तेव्हा गांधीजी जेवायला बसले होते. लहान मूल पाहताच त्याला गांधीजींनी एक गाकर दिला पण त्या बाळाच्या आईनं त्याच्या हातातून तो एकदम खेचून घेतला अन् ती त्याला म्हणाली, 'आधी थँक यू म्हण' पण ते लहान मूल काही 'थँक यू' म्हणेना. आईनं त्याला पुन्हा पुन्हा बजावलं, 'थँक यू' म्हण आधी तरच देईन गाकर.' शेवटी आपल्या बोबड्या बोलीत तो रागारागानं म्हणाला, 'ठेंकू !' हा तमाशा केव्हा संपतो त्याची गांधीजी वाटच पाहात होते. ते त्या बाळाच्या आईला म्हणाले, समुद्रालाच आग लागली तर सांगायचं कुणाला? तो एक दैवी कोपच समजायचा ना?' त्या बाईला काही गांधीजींचं म्हणणं उमजेना पण तिच्याजवळ असलेली दुसरी एक भगिनी म्हणाली, 'अहो, मुलाला तुम्ही गुजरातीऐवजी इंग्रजीत 'थँक यू' म्हणायला शिकवलंय ना, त्याच्यावर ही टीका आहे. बापूंची !' त्यावर गांधीजी म्हणाले, 'छे, छे मी टीका नाही करीत पण परभाषेच्या गुलामीचं विष किती खोल गेलंय याचा विचार करतो. ही मुलगी तर सरदार वल्लभभाईंची अर्थात एका देशभक्ताची सून. माझ्या दृष्टीनं हिला बिचारीला इंग्रजीचं फारसं ज्ञान नाहीच पण तरीसुद्धा आपल्या मुलाला इंग्रजी शब्द शिकवायचा तिचा असा दुराग्रहच असल्यावर कुणाला बोल लावायचा !' ते पुढे म्हणाले, 'जर आमच्या माताच हा भाषेचा गुंता उकलू शकल्या तर आपण मात्र इंग्रजीच्या बेडीतून मुक्त होऊ अन् मातृभाषा किंवा राष्ट्रभाषा यांचा विकास करू शकू.'

कथा उपदेश : इंग्रजीचे महत्त्व वाढते असले तरी मातृभाषा कमी महत्त्वाची नाही. तिचा उपयोग जास्तीत जास्त केला पाहिजे.



## पंचांग

| पंचांग | कृष्ण पक्ष |
|---|---|
| १३ जुलै २०२६ | तिथि:चतुर्दशी १८:४९:४५ |
| सोमवार | नक्षत्र:आर्द्रा २६:५१:१८+ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:ध्रुव १५:५९:५६ |
| निज ज्येष्ठशके | करण:विष्टि ०८:४०:०६ |
| संवत्– १९४८ | करण:शकुनि १८:४९:४५ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:चतुष्पाद |
| अयन– दक्षिणयन | २९:००:२४+ |
| मास– निज ज्येष्ठ | सूर्य:मिथुन |
| ऋतु– सौर वर्षा | चन्द्र:मिथुन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 4 | | | | 5 | 8 | |
| | 3 | | 4 | | 5 | | | 1 |
| 5 | 1 | | 3 | | | 7 | | |
| | 7 | | | | 3 | | 1 | 5 |
| | | | 5 | | 6 | | | |
| 3 | 2 | | 9 | | | | 6 | |
| | | 3 | | | 8 | | 5 | 9 |
| 8 | | | 2 | | 9 | | 4 | |
| | 4 | 2 | | | | 3 | 7 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १००८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 6 | 9 | 8 | 1 | 2 | 5 | 7 |
| 1 | 2 | 7 | 4 | 5 | 3 | 8 | 6 | 9 |
| 9 | 5 | 8 | 7 | 6 | 2 | 1 | 3 | 4 |
| 4 | 8 | 1 | 5 | 9 | 6 | 7 | 2 | 3 |
| 5 | 6 | 2 | 8 | 3 | 7 | 4 | 9 | 1 |
| 7 | 3 | 9 | 1 | 2 | 4 | 6 | 8 | 5 |
| 8 | 7 | 3 | 6 | 4 | 5 | 9 | 1 | 2 |
| 6 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 4 | 8 |
| 2 | 9 | 4 | 3 | 1 | 8 | 5 | 7 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९४ – व्हॉस्गेसची लढाई.
- १८३२ – हेन्री रोव स्कूलक्राफ्टने मिसिसिपी नदीचे उगमस्थान शोधले.
- १८६३ – सक्तीच्या सैन्यभरतीविरुद्ध न्यूयॉर्क शहरात दंगल.
- १८७८ – १८७८चा बर्लिनचा तह – सर्बिया, मॉंटेनिग्रो व रोमेनिया ओट्टोमन साम्राज्यातून वेगळे झाले.
- १९०८ – ऑलिंपिक स्पर्धांमध्ये स्त्रीयांना भाग घेण्यास परवानगी.
- १९०९ – कॅनडातील कोक्रेन, ऑन्टारियो शहराजवळ जमिनीत सोने सापडले.

### राष्ट्रीय

- १९१२ – मौलाना अबुल कलाम आझादनी अल हिलाल या उर्दू भाषेतील नियतकालिकाचे प्रकाशन सुरू केले.
- २००७ – प्रसिद्ध गीतकार समीर यांना काशी गौरव पुरस्कार मिळाला.

### जन्म

- १५९० – पोप क्लेमेंट दहावा.
- १६०८ – फर्डिनांड तिसरा, पवित्र रोमन स्राट.
- १८०८ – पॅट्रिस मॅकमहोन, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.
- १८९३ – प्रसिद्ध गायिका केसरबाई केरकर.
- १९४० – पॅट्रिक स्टुअर्ट, इंग्लिश अभिनेता.

### निधन

- ९३९ – पोप लिओ सातवा.
- १७६१ – तोकुगावा लेशिगे, जपानी शोगन.
- १७९३ – ज्याँ पॉल मरात, फ्रेंच क्रांतीकारी.
- १९८० – सेरेत्से खामा, बोत्स्वानाचा पहिला राष्ट्राध्यक्ष.
- १९९० – क्रिकेट सामन्याचे अतिशय सुदंर धावते वर्णन करणारे प्रसिद्ध क्रीडा–समीक्षक बॉबी तल्यारखान.

## : SMS :

Santa ne challenge kiya.....
"Ki woh kutubminar ko sr pe rakh k mumbai le jayega"...
Sare new channel wale waha pahuch gye....
Tab bola "Bas koi utha k sar pe rakh de"...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.९ | २४.७ |
| अहमदनगर | ३१.९ | २२.६ |
| अकोला | ३६.७ | २६.५ |
| अमरावती | ३६.२ | २६.१ |
| बीड | ३८.८ | २६.७ |
| भंडारा | ३८ | २६.१ |
| बुलढाणा | ४३.९ | २७.२ |
| चंद्रपूर | ३८.९ | २७.३ |
| चेन्नई | ४२.९ | ३१.४ |
| नवी दिल्ली | ४५.३ | ३४.४ |
| धुळे | ३७.३ | २५.७ |
| गोंदिया | ३६.६ | २५.७ |
| जळगाव | ३७.२ | २५.८ |
| कोल्हापूर | ३१.६ | २२.७ |
| लातूर | ३३.६ | २३.२ |
| मुंबई | ३७ | ३३.४ |
| नागपूर | ३७.४ | २५.१ |
| नांदेड | ३५.७ | २६.१ |
| नंदूरबार | ३३.९ | २६.३ |
| नाशिक | ३१.८ | २३.२ |
| पुणे | २९.७ | २२.८ |
| पंढरपूर | ३५ | २४.३ |
| सातारा | ३१.८ | २१.७ |
| सांगली | ३३ | २३.२ |
| सोलापूर | ३५.२ | २४.७ |
| वर्धा | ३८.३ | २६.५ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा :पश्चिम पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम आज आपणास दिसणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम आर्थिक उत्पन्न वाढण्याचे योग आहेत त्या दृष्टीने प्रयत्न करा. आपल्या हिताचा सल्ला मिळेल.

**मिथून :** शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा: उत्तर कौटुंबिक जीवन आनंदमय राहील. वाद विवाद करू नका. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर शैक्षणिक प्रतिस्पर्धेमध्ये आपणाला यश मिळणार आहे. व्यवसाय उत्तम चालणार आहे. समाजात यश, प्रतिष्ठा वाढेल.

**सिंह :** शुभ रंग– गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम प्रयत्न केले तर अशक्य असलेली कामे पार पडतील.तणाव निर्माण झाल्यामुळे मन विचलित होईल.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पश्चिम घरच्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नका. साहित्यिक कार्यक्रमात भाग घ्याल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तूळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:दक्षिण धन, संपत्तीच्या प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने लागेल.

**वृश्चिक :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा:उत्तर शुभकार्याची रूपरेषा आखल्यामुळे आपल्याला आनंद होणार आहे. आपल्या कामाची दखल घेतील.


**धनू :** शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: उत्तर व्यापारात आवश्यक असलेला बदल करावा फायदेशीर रहाल. व्यवसायाची सुरूवात लाभदायक ठरणार आहे.

**मकर :** शुभ रंग :काळा, शुभ दिशा :उत्तर जीवनासाथीचे सहकार्य मिळाल्याने आत्मविश्वस वाढणार आहे. आपली प्रतिष्ठा वाढेल.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम अतिऊत्साह आपल्या दृष्टीने हानीकारक ठरणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून संयमाने काम केले तर फायदेशीर राहील.

**मीन :** शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:पश्चिम वातावरण आनंदमय राहिल्यामुळे नवीन योजना साकार होतील. आरोग्य खराब होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००९



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन, २७. मैत्रीण
२८. पार्वती
२९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान, ३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन
६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन, ८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाड्मायप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी
६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

**जम्बो शब्दकोडे क्र. १००८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.देह ३.जो आवडतो सर्वांना १०.आजी ११.वरद १३.कजाग १४.महिषासुर १६.वाकडा १८.लागवड २१.वाद २२.क्षिती २३.नीर २६.गबाळा २८.पितर २९.बक ३०.समा ३१.गंमत ३२.इच्छा ३३.काडी ३४.सुर ३५.मित ३६.जिथे ३९.पर्वत ४०.गणेश ४२.अंगार ४४.मोलकरीण ४६.भारत ४७.तसा ४९.गवत ५०.वात ५१.ऋषी ५२.तपासणी ५३.मार ५४.मत ५५.हल्ली ५६.वर ५७.तंबोरा ५८.श्रुत ५९.चर ६०.कमी ६१.वाली ६२.नगरी ६४.गहाळ ६५.बारा ६६.शेगडी ६८.कातरवेळ ७१.करार ७२.आवर ७३.कव ७४.नट ७५.कारण ७६.सेनापती ७८.भंबेरी ७९.चार ८०.नवासी ८१.तोवर ८२.गज ८३.इकडे आड ८४.कर्ण ८५.कळस

उभे उत्तर : १.देवयानी २.हर ४.आकडा ५.वजा ६.डगला ७.सराव ८.नाम ९.विषाद १०.आरक्षित १२.दवा १५.हिवाळा १७.कर्ता १९.गट्टी २०.डगमगणे २२अ. तीर २४.रबडी २५.जमा २७.बात २८.पिच्छा ३०.सरपण ३२.इथे ३३.काडीमोड ३५.मितभाषी ३७.ज्या गावच्या बोरी ३८.सकवार ४०.गत ४१.शतपावली ४२.अंग ४३.रत ४५.रीत ४८.सासर ५१.ऋत ५३.मात ५४.मरगळ ५५.हमी ५७.तंगडी ५८.श्रुतिका ६०.कळकट ६१.वारा ६२.नगरसेवक ६३.चूर ६५.बारकावा ६६.शेव ६७.अवतीर्ण ६९.तरबेज ७०.वेळ ७२.आण ७३.कप ७४.नरडे ७५अ.रसिक ७७.नारळ ७८.भंग ७९.चाक ८०.नड

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## दलित पँथरच्या 54 व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात भरगच्च कार्यक्रम

■ महापौर मंजुषा नागपुरे यांचा नागरी सत्कार; उपमहापौर परशुराम वाडेकर यांना 'पँथर रत्न' पुरस्कार

पुणे (दैनिक संध्या) : दलित पँथरच्या ५४ व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असल्याची माहिती दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे, पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम, कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने, शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांचा पुणेकरांच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार असून, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांना प्रतिष्ठेचा 'पँथररत्न पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. तसेच पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, वाहतूक विभागाचे उपायुक्त संदीप भाजीभाकरे, सहआयुक्त मनोज पाटील, माजी राज्यमंत्री रमेश बागवे यांच्यासह विविध क्षेत्रातील एकूण ५४ मान्यवरांचा 'पँथररत्न' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय, देऊळबंद २ चित्रपटाचे दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे तसेच अभिनेते रमेश परदेशी यांचा जाहीर नागरी सत्कारही या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेत बोलताना यशवंत नडगम म्हणाले, "१९७२ साली अन्याय, अत्याचार आणि विषमतेविरुद्ध संघर्षाची मशाल पेटवणाऱ्या दलित पँथर चळवळीचा ५४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून, समाजातील सर्व घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याची शोभा वाढवावी." कार्यक्रमात विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांचे विशेष व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भव्य ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला दलित पँथरचे केंद्रीय उपाध्यक्ष श्रीकांत लोणारे, प्रदेशाध्यक्ष संतोष गायकवाड, पुणे जिल्हाध्यक्ष मिलिंद सरवडे, पुणे शहराध्यक्ष आकाश पायाळ, जनसंपर्क प्रमुख बंडू गवळी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना : ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकाचा मृत्यू

पुणे (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो येथे झालेल्या दुर्घटनेत चौथ्या दिवशीच्या शोधमोहीमेत दुर्घटनाग्रस्त इमारतीत अडकलेल्या ७ नागरिकांच्या मृत्यूसह इमारतीशेजारील ढिगाऱ्याखाली मध्यरात्री १ वाजता आढळून आलेल्या वामन कसबे (वय ५०, मोशी) या नागरिकाचाही मृत्यू झाला आहे. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या ९ इतकी झाली असून या दुर्घटनेतील सर्व नागरिकांचा शोध पूर्ण झाल्याने बचावकार्य थांबविण्यात आले आहे. ८ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास मोशी कचरा डेपो येथे इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून दुर्घटना घडली. या इमारतीत व इमारतीबाहेरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ, भारतीय सेना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीस प्रशासन तसेच इतर संबंधित यंत्रणांकडून बचावकार्य सुरू करण्यात आले. घटना घडल्यानंतर लागलीच पाच नागरिक स्वतः बाहेर आले होते. उर्वरित १८ नागरिकांपैकी ९ नागरिकांना दुर्घटनाग्रस्त इमारतीतून बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. तब्बल ८४ तास अविरत चाललेल्या या बचावमोहीमेतील शोधकार्यामध्ये चौथ्या दिवशी इमारतीत अडकलेल्या ७ आणि इमारतीशेजारील ढिगाऱ्यात अडकलेल्या १ अशा ८ व्यक्तींचा मृत्यू झाला. तर इमारतीत अडकलेल्या भावेश वाणी यांचा ९ जुलै रोजी मृत्यू झाला होता. बचावकार्याच्या चौथ्या दिवशी अक्षय सावंत (वय ३५, मोशी), सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (वय २२, मोशी) तसेच राहुल गायकवाड (वय ३४, मोशी) यांचा मृत्यू झाला. एक नागरिक इमारतीशेजारील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकून पडल्याने त्याठिकाणी निरंतर शोधमोहीम सुरू होती. अखेर चौथ्या दिवशी मध्यरात्री १ वाजता वामन कसबे (वय ५०, मोशी) यांचा शोध लागला. त्यांना तातडीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, तपासणीअंती त्यांना मृत घोषित करण्यात आले. संपूर्ण बचावकार्यादरम्यान आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी प्रत्येक घडामोडीवर बारीक लक्ष ठेवून होते. दुर्घटनाग्रस्त इमारतीमध्ये सुरक्षित प्रवेश करण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या. अशा परिस्थितीत इमारतीच्या बाजूचा कचऱ्याचा ढीग वेगाने हटविल्यानंतर या इमारतीत प्रवेश करण्याचे सर्व बाजूंनी प्रयत्न करण्यात आले. इमारत अस्थिर असल्याने ती पूर्ण कोसळून आत अडकलेल्या जीवितांना धोका पोहोचू नये, याची काळजी घेऊन बचावकार्य राबविण्यात येत होते. इमारतीचा वरचा मजला हटविण्यासाठी दोन अत्याधुनिक डिमोलिशन एक्सकॅव्हेटर यंत्रे मागविण्यात आली.

### 'सूर्यदत्त'च्या कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे

# वारकऱ्यांसाठी 'आरोग्य भारती - चरण सेवा' उपक्रमाचे आयोजन

**पालखी सोहळ्यात पाहायला मिळाला फिजिओथेरपी, आरोग्य मार्गदर्शन व समाजसेवेचा अनोखा संगम**



पुणे (दै. संध्या)

आषाढी वारीनिमित्त वारकरी भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्च आणि मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य भारती - चरण सेवा' या विशेष आरोग्य सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पुण्यातील नाना पेठ येथे आयोजित या समाजोपयोगी उपक्रमात २५० हून अधिक वारकऱ्यांनी सेवा, आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना समाजसेवेची अनोखी मानवंदना म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. 'संस्कार, संस्कृती आणि शिक्षण' या त्रिवेणीवर आधारित हा सेवा उपक्रम प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर व प्राचार्या डॉ. सारिका झांबड यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला.

आषाढी वारीदरम्यान शेकडो किलोमीटर पायी प्रवास करणाऱ्या वारकरी भाविकांना होणारा स्नायू व सांध्यांचा ताण, पायातील वेदना, थकवा आणि इतर शारीरिक त्रास लक्षात घेऊन कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. चैताली नेवे (पीटी), डॉ. आयझॅक साळवे (पीटी) आणि डॉ. अक्षता माने (पीटी) यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांची सखोल तपासणी करून आवश्यक फिजिओथेरपी उपचार दिले. यामध्ये वेदनाशामक उपचार, सॉफ्ट टिश्यू व मायोफॅशियल रिलिज, जॉइंट मोबिलायझेशन, स्ट्रेचिंग व स्ट्रेंथनिंग व्यायाम, शरीरस्थिती सुधारणा, चालण्याचे प्रशिक्षण (गेट ट्रेनिंग), संतुलन व कार्यक्षमतेसाठी व्यायाम, आवश्यकतेनुसार किनेसिओ टेपिंग, घरच्या घरी करण्यासाठी व्यायाम, योग्य चालण्याबाबत मार्गदर्शन, दुखापत प्रतिबंधक उपाय तसेच किरकोळ स्नायू व सांध्यांच्या दुखापतींवरील प्रथमोपचार अशा विविध सेवा पुरविण्यात आल्या.

याचबरोबर सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चमधील पदवी व पदविका फार्मसी अभ्यासक्रमातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी वारकऱ्यांसाठी पायांची मालिश (फूट मसाज), प्राथमिक आरोग्य तपासणी, औषधोपचार, आरोग्य समुपदेशन, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन तसेच इतर समाजोपयोगी सेवा दिल्या. या दोन्ही महाविद्यालयांच्या विद्यार्थी-शिक्षकांनी समन्वयाने दिलेल्या या सेवेमुळे वारकऱ्यांना शारीरिक थकवा व वेदनांपासून दिलासा मिळाला. दीर्घ पायी वारीदरम्यान आरोग्याची काळजी कशी घ्यावी, पायांची योग्य निगा कशी राखावी आणि दुखापतींपासून बचावासाठी कोणती खबरदारी घ्यावी याबाबतही उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाचे वारकरी भाविकांनी मनापासून स्वागत करत सूर्यदत्तच्या विद्यार्थी-शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि मानवसेवेच्या भावनेचे कौतुक केले.

शिबिरात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत फिजिओथेरपी उपचार आणि आरोग्य सेवेमुळे मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली. रास्ता पेठ येथील मराठा मित्र मंडळाचे सदस्य उमेश शेडगे यांनी प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या समाजाभिमुख कार्याचे आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना रुजविण्याच्या त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे विशेष कौतुक केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "आषाढी वारी ही केवळ श्रद्धेची परंपरा नसून सेवा, समर्पण आणि मानवतेचा उत्सव आहे. वारकरी भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याची बाब आहे. 'संस्कार, संस्कृती आणि शिक्षण' या सूर्यदत्तच्या मूल्यांसोबत समाजसेवेची भावना प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये रुजावी, हा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. 'आरोग्य भारती – चरण सेवा' या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या सेवेसाठी करत 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला आहे. भविष्यातही सूर्यदत्त विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनकल्याणकारी उपक्रमांद्वारे समाजाशी असलेली आपली बांधिलकी अधिक दृढ करत राहील."

> या उपक्रमातून 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' हा संदेश प्रभावीपणे अधोरेखित झाला. वारकरी भाविकांचा प्रवास अधिक सुरक्षित, निरोगी आणि सुखकर व्हावा या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या व्यवस्थापनाने कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, कॉलेज ऑफ फार्मसी, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि आयोजकांचे अभिनंदन करून समाजहितासाठी असे सेवा उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## महाराष्ट्रातील ३ हजार विद्यार्थ्यांचे 'निरंजन'ने घेतले शैक्षणिक पालकत्त्व

पुणे (दै. संध्या)

दुष्काळग्रस्त बीड सह अहिल्यानगर आणि पुण्यासह आजूबाजूच्या ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्याकरीता महाराष्ट्रातील ३ हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व पुण्यातील निरंजन सेवाभावी संस्थेने घेतले आहे. क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून पुणे आणि परिसरातील तब्बल २९ शाळांमधील २ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट प्रदान कार्यक्रम बुधवार, दिनांक १५ जुलै रोजी सकाळी १० वाजता स्वारगेटजवळील गणेश कला क्रीडा मंच येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. नवनीत मानधनी यांनी दिली.

शैक्षणिक किट प्रदान कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कार्यकारी संचालक कृष्णकुमार बूब, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे रुग्णवाहिका व पाण्याचे टँकर रवाना

पुणे (दै. संध्या)

■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचा पुढाकार; उपक्रमाचे ३७ वे वर्ष

■ तीन पालख्यांसोबत सुसज्ज रुग्णवाहिका, डॉक्टर्स आणि वैद्यकीय सेवेची विनामूल्य सोय



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज,जगद्गुरु तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका यांच्या पालखी सोहळ्यासोबत वारक-यांच्या सेवेकरीता तीन सुसज्ज रुग्णवाहिका श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने पुण्यातून रवाना झाल्या. याशिवाय वारक-यांच्या सेवेत पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील पाठविण्यात आले. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत या उपक्रमाची सुरुवात झाली असून मोठया प्रमाणात डॉक्टर्स, औषधे व आरोग्यविषयक सेवा पालखी सोहळा समारोपापर्यंत विनामूल्य पुरविण्यात येणार आहे.

गणपती मंदिरासमोर रुग्णवाहिकेचे पूजन करुन या उपक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, ट्रस्टचे उपाध्यक्ष व उपक्रमाचे नियोजन करणारे डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांसह पदाधिकारी उपस्थित होते. उपक्रमाचे यंदा ३७ वे वर्ष आहे.

डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे म्हणाले, कित्येक किलोमीटरचा पायी प्रवास करणा-या वारक-यांच्या आरोग्याची काळजी घेत, आवश्यक आरोग्यविषयक सेवा त्वरीत मिळाव्यात, याकरीता या उपक्रमाचे आयोजन केले जाते. सासवड मार्गे जाणा-या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोहळ्यासोबत, लोणीमार्गे जाणा-या संत तुकाराम महाराजांच्या पालखीसोहळ्यासोबत आणि संत सोपानकाका पालखी सोहळ्यासोबत या रुग्णवाहिका असणार आहेत.

## वारकऱ्यांचा 'चरण सेवा' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद : मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा उपक्रम : रामेश्वर नाईक

पुणे (दै. संध्या)



आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'चरणसेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे, अशी माहिती कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज असून सेवा करीत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच पुणे शहरातील उपक्रमाला भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला. वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा असल्याचे सांगत अशा सेवाकार्यात सहभागी होणे हे मोठे भाग्य असल्याची भावना श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

श्री. रामेश्वर नाईक, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित गतवर्षी 'चरणसेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वर्षीही ११ जिल्ह्यांतील सुमारे ४०० सेवा केंद्रांवर १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक कार्यरत असून, ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेल, रुग्णवाहिका सेवा आणि ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरणसेवा' उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# ऑपरेशन टायगर हे उद्धव ठाकरे यांच्या कर्माचे फलित

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची टीका

> अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय हा न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात आला आहे. बौद्ध समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे ही बाब स्पष्ट आहे. मातंग समाजात देखील शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे, असे मत आठवले यांनी व्यक्त केले. लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असावे, असे आपल्या पक्षाचे मत असल्याचा पुनरुच्चार आठवले यांनी केला. समाजातील प्रत्येक वंचित घटकाला घटनेने दिलेले लाभ मिळाले पाहिजे, अशीच आपली भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं.

पुणे (दै. संध्या)



ऑपरेशन टायगर हे भारतीय जनता पक्ष अथवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे घडवून आलेले नाही; तर ते ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कर्माचे फलित असल्याची टीका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच शिवसेनेचे मुख्य नेते असून त्यांच्यावरील विश्वासामुळेच अन्य पक्षातील नेते आणि कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. उद्धव ठाकरे यांना आपलेच लोक सांभाळता आले नाहीत. त्यामुळेच त्यांच्या पक्षाची ही अवस्था झाली आहे. ठाकरे यांनी महाविकास आघाडी केली नसती तर आज त्यांच्यावर ही वेळ आली नसती, असेही आठवले यांनी नमूद केले. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत रामदास आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, महिपाल वाघमारे, नगरसेविका हिमाली कांबळे, मोहन जगताप, ॲड. मंदार जोशी, शाम सदाफुले, विरेन साठे, बसवराज गायकवाड, अण्णा वायदंडे, शशिकला वाघमारे, संघमित्रा गायकवाड, जयदेव रंधवे, क्रिस्टोपर राजमनी, थॉमस मॅडम, रेश्मा शेख, मिलाज मेमन, अरविंद शिंदे, बाबा साळवे, उमेश कांबळे, सचिन गवळी आदी उपस्थित होते. रामदास आठवले म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार हे देशाच्या राजकारणातील महत्त्वाचे आणि आदरणीय नेते आहेत. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये समाविष्ट करण्याचे आवाहन आपण यापूर्वीच केले होते. ते त्यांनी मान्य केले असते तर ते कदाचित देशाचे राष्ट्रपती होऊ शकले असते, असा दावाही आठवले यांनी केला. तसेच आपण पवार यांच्याबरोबर होतो तेव्हा त्यांना काँग्रेस मध्ये विलीन होण्याचा सल्ला दिला होता. तो त्यांनी मानला असता तर कदाचित ते देशाचे पंतप्रधान झाले असते, असा दावाही आठवले यांनी यावेळी केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे विलीनीकरण झाले असते तर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे पक्षाध्यक्ष झाले असते. मात्र, सध्याच्या परिस्थितीमध्ये दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता मावळली असल्याचे मत आठवले यांनी व्यक्त केले. अर्थात शरद पवार यांचा पक्ष अजूनही राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये समाविष्ट होऊ शकतो. त्यातच समाजाचे आणि देशाचे हित आहे, असेही आठवले म्हणाले.

एकनाथ खडसे हे राज्याच्या राजकारणातील महत्त्वाचे ज्येष्ठ नेते आहेत. मात्र, त्यांना स्थानिक पातळीवर मोठा विरोध आहे. तरीदेखील ते भारतीय जनता पक्षात येऊ इच्छित असतील तर भाजपने त्याबाबत सकारात्मक विचार करावा, असा सल्लाही आठवले यांनी दिला.

अयोध्येच्या राम मंदिरात झालेला गैरव्यवहार ही अत्यंत गंभीर गोष्ट असून दोषींना कठोर शासन करण्यासाठी मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन आणि संबंधित नेते सक्षम असल्याचे मत आठवले यांनी व्यक्त केले.

आमदार रत्नाकर गुट्टे यांनी ॲट्रॉसिटी कायद्याबद्दल केलेल्या विवादास्पद विधानावरही आठवले यांनी भाष्य केले. ॲट्रॉसिटी कायदा हा वंचित समाजाला न्याय देण्यासाठी अस्तित्वात आला असून इतरांवर अन्याय करणे हे त्याचे उद्दिष्ट नाही. त्याचा दुरुपयोग होऊ नये आणि त्यामुळे इतरांवर अन्याय होऊ नये ही आपली आणि आपल्या पक्षाची भूमिका असल्याचे आठवले यानी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रामध्ये मंत्री करावे म्हणजे अर्थातच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशिवाय पर्याय राहणार नाही, या आमदार बच्चू कडू यांच्या विधानावर आठवले यांनी टीका केली. सन 2029 पर्यंत देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रीपदी राहतील आणि भाजप शिंदे यांना यापुढे मुख्यमंत्री होऊ देणार नाही, असे मत आठवले यांनी व्यक्त केले.

मातृभाषेचा अभिमान बाळगणे अत्यावश्यकच आहे. मात्र त्या अभिमानातून अन्य भाषांचा द्वेष करणे हा संविधानाचा अपमान आहे, असे मत आठवले यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंदी भाषेत केलेल्या भाषणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेच्या अनुषंगाने ते बोलत होते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईमध्ये 60 टक्के मराठी लोक राहतात तर 40 टक्के अन्य भाषिक लोक राहतात. त्यामुळे देशभरात बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेत भाषण करणे अजिबात गैर नाही, असेही आठवले म्हणाले. राज ठाकरे हे मोठे नेते आहेत. त्यांनी भाषेबाबत व्यापक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# खेड घाट परिसरात महामार्गावरील सिमेंट रस्त्याला तडे

**चाकण (दै. संध्या) :**

■ **निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाढतेय डोकेदुखी**



> “पुणे - नाशिक महामार्गावर खेड घाट ते थेट सिन्नर पर्यंत १०५ किलो मीटर रस्ता तब्बल ३३६ कोटी रुपये खर्च करून संपूर्ण सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आला आहे. खेड घाट परिसरात रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली होती. या संदर्भात संबंधित ठेकेदार व एनएचआयच्या अधिका-यांना कळविण्यात देखील आले होते. परंतु याकडे त्यांनी गांभीर्याने घेतले नाही.”
>
> **- दिलीप मेदगे, समन्वयक अभियंता, पुणे - नाशिक राष्ट्रीय महामार्ग**

पुणे - नाशिक महामार्गावर पुढील पंचवीस वर्षे खड्डेमुक्त राहणाऱ्या व्हाईट टॉपिंगर या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात आलेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या काँक्रिट पॅनल्समध्ये पहिल्याच पावसात तडे जाणे आणि खड्डे पडणे सुरू झाले आहे. खेड घाट परिसरात महामार्गावरील सिमेंट रस्त्याला अनेक ठिकाणी तडे गेले आहेत. तब्बल तीनशे कोटीहून अधिक निधी खर्च करून असा निकृष्ट दर्जाचा रस्ता बांधण्यात आल्याने अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पुणे - नाशिक महामार्गावरील सिमेंट रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम आणि त्यामुळे निर्माण झालेले खड्डे किंवा उखडलेले पॅचेस प्रवाशांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहेत. खेड घाटा पासून पुढील भागात रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्यामुळे वाहनांचे नुकसान होत आहे. नव्याने तयार केलेल्या काँक्रिट पॅनल्समध्येही तडे जाणे आणि खड्डे पडणे सुरू झाले आहे. ज्या ठिकाणी पुलांची कामे झाली आहेत, अशा ठिकाणी सुरुवातीचे व शेवटचे भाग व्यवस्थित जोडलेले नसल्याने वाहने आदळतात. पुणे - नाशिक महामार्गाचे काँक्रीटीकरण मशीन व्हाईट टॉपिंगर या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

यामुळे हा रस्ता पुढील पंचवीस वर्ष खड्डे मुक्त राहणार असल्याचा दावा देखील करण्यात आला होता. परंतु पहिल्याच पावसात या सिमेंट काँक्रिट रस्त्याला तडे जाण्यास सुरूवात झाली आहे.

## मोशी कचरा डेपो बंद करून ताबडतोब पुनावळे कचरा डेपो सुरू करा : वाघेरे

**पिंपरी (दै. संध्या) :**

मोशी कचरा डेपो १९८२ साली सुरू करण्यात आला आहे. आज मोशी कचरा डेपोला ४४ वर्षे पूर्ण झाली आहेत. कचरा डेपोची क्षमता पंधरा वर्षांपूर्वीच संपली आहे. तरी मोशी कचरा डेपो हा पैसे कमविण्याचे साधन म्हणून आता पर्यंत सुरू ठेवण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने १९९७ साली पुनावळे कचरा डेपोचे आरक्षण टाकले आहे. ते आरक्षण आजही आपल्या विकास आराखड्यात आहे. आपण पुनावळे कचरा डेपो साठी शासनाकडे २००६ साली ४ कोटी रुपये जमा केले आहेत. कचरा डेपोची क्षमता संपली असल्यानेच ही घटना घडली असून निष्पाप नागरिकांचे जीव गेले आहेत. त्यामुळे मोशी कचरा डेपो ताबडतोब बंद करून पुनावळे कचरा डेपो ताबडतोब कार्यान्वित करावा ,अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पुनावळे कचरा डेपोला ज्या ज्या राजकीय नेत्यांनी लोकप्रतिनिधींनी, आमदार, खासदारांनी विरोध केला ते सर्व जण मोशी कचरा डेपो दुर्घटनेला जबाबदार आहेत.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सुचना**

राजगुरुनगर विभागाअंतर्गत चाकण उपविभागांतर्गत येणाऱ्या पीसी (PC) १ आणि २ मधील ग्राहकांचे, दरमहा मीटर वाचन (Monthly Meter Reading) महावितरण मोबाईल ॲप (Mahavitaran Mobile App) किंवा IR/RF HHU द्वारे करणे. यात २० किलोवॅटपर्यंत भार असलेल्या LT ग्राहकांचा समावेश आहे (तसेच, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद आणि नगरपंचायत हद्दीतील कृषी (AG) मिटर शहरी LT ग्राहक वगळता इतर सर्व AG ग्राहक वगळले आहेत). या कामामध्ये देयक छपाई (Bill Printing) आणि थेट ग्राहकांच्या जागेपर्यंत देयक वितरण (Bill Distribution) यांचा समावेश आहे. सदर कामासाठी ठेका पद्धतीने नामांकित व नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदा क्र. EE/RGR/T-17/MR/CKN SDN/२०२६–२७ (निविदा रक्कम रुपये ३०.०० लाख) निविदा विक्री कालावधी १३.०७.२०२६ ते १६.०७.२०२६ पर्यंत, निविदा भरण्याची अंतिम तारिख १६.०७.२०२६., तांत्रिक निविदा उघडणेची तारीख १७.०७.२०२६. काही अपरिहार्य कारणास्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील . इसारा शुल्क ऑनलाईन किंवा डी.डी. च्या स्वरुपात निविदा भरणा मुदतीपूर्वी विभागीय कार्यालयात भरणे आवश्यक आहे.

अधिक माहिती साठी कृपया कंपनीचे संकेतस्थळ :–
https://etender.mahadiscom.in/eatApp/

(पीआरओ/पुणे झोन: क्र.८२/२०२६–२७.)

कार्यकारी अभियंता,
महावितरण, राजगुरुनगर विभाग.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः, आढले खुर्द ता. मावळ, जि. पुणे येथिल व परिसरात सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते कि,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. सोपान मल्हारी येवले रा. आढले खुर्द, ता. मावळ, जि. पुणे यांचे मालकी वहिवाटीचे व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस आहे. व सदर मिळकत ही त्यांनी विक्री करण्याचे ठरविले असुन, सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोंखमी बोजारहित असुन, तशी खात्री व भरवसा त्यांनी खरेदी घेणार यांना दिलेला आहे. तरीदेखील कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून ही नोटीस प्रसिद्ध केली असे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात कोणाचेही कोणत्याही प्रकारचे दावा, मालकी, हक्क, हितसंबंध अगर ताबेवाहिवाट , असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाचे आंत त्यांचे सदर मिळकतीशी असलेल्या हक्काबाबत आमचे खाली दिलेल्या पत्त्यावर हजर राहून,आवश्यक त्या कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी.अन्यथा सदर मिळकत श्री सोपान मल्हारी येवले यांचे शिवाय अन्य कुणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क संबंध आगर तांबे वहिवाट नाही व सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी,व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन - तुकडी व जिल्हा परिषद पुणे, पोट तुकडी तालुका मावळ, पंचायत समिती मावळ पैकी ग्रामपंचायत आढले खुर्द, येथिल व मे. दुय्यम निबंधक सो. मावळ यांचे हद्दितील मौजे आढले खुर्द येथिल मिळकत - खाते नं.३७६९ -

गट नं. २९३ पै. क्षेत्र.०० हे.२७.५० आर, आकार ,००रु.२० पैसे यापैकी क्षेत्र ००हे ११ आर ही मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील लाकुड, माती, दगड, धोंडा तसेच त्यामधील इतर तदंगभूत वस्तूसहित तसेच सदर जागेमध्ये येणेजाण्याचे व वहिवाटीचे हक्कासहित व अधिकार सुद्धा मिळकतीत कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखून न ठेवता मिळकत.

दि : १२/०७/२०२६.
जुन्नर
येणेप्रमाणे जाहिर नोटीस

सही/-
**अँड. रोहिणी लक्ष्मण गाडेकर**
**(बी. ए. एल. एल. बी. डी. एल. एल.)**
**रा. सुर्या हाईटस, ओ-विंग, फ्लॅट नं. १०७,कल्याण पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.**
**मोबाईल नं. ९८६०४८३०३१.**



**जाहीर नोटीस**

अॅड. किरण सुधीर मते, ऑफिस नं. ६ - साकार नगरी, जुन्नर रोड, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांजतर्फे आमचे अशिल तर्फे जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे,

तमाम नागरिकांस विशेषतः गाव मौजे पारगाव तर्फे खेड, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील रहिवासी यांस तसेच आजूबाजूचे परिसरातील रहिवासी यांस नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद परिशिष्ठ मध्ये नमूद केलेल्या मिळकती संदर्भात आमचे आशिल व मिळकतीचे मालक व ताबे वहिवाट दार यांचे मध्ये मिळकतीची खरेदीचा व्यवहार ठरलेला आहे. खाली परिशिष्ठ मध्ये नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांस खरेदी घ्यावयाची आहे. त्यामुळे सदर मिळकती संदर्भात या पूर्वी कोणाचेही लाभात साठेखत, गहाण, खरेदीखत अथवा हस्तांतरक्षम दस्त अस्तित्वात आणलेला असेल अगर मिळकतीचे मालकांनी लिहून व नोंदवून दिलेला असल्यास तसेच सदरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही हितसंबंध असल्यास संपर्क करून, तुमच्याकडे असलेल्या कागदपत्रानिशी ७ दिवसांचे आत हितसंबंध असल्याची खात्री पटवून द्यावी. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कोणाचाही हितसंबंध असल्याची खात्री पटवून न दिल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, सदरची मुदत संपल्यानंतर आमचे आशिल मिळकती संदर्भात नोंदणीकृत दस्त अस्तित्वात आणून व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मिळकती संदर्भात कोणाचीही तक्रार अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोटतुकडी ता. आंबेगाव, जिल्हा परिषद पुणे, पं. स. आंबेगाव, मा. दुय्यम निबंधक सो. घोडेगाव यांचे हद्दीतील गाव मौजे पारगाव तर्फ खेड येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७५२ | ०१.२४ | ०३.५६ |
| यांसी चतुसिमा खालीलप्रमाणे | | |
| पुर्व – गट नं. ७५३ | दक्षिण – गट नं. ७४९ | |
| पश्चिम - गट नं. ७५० | उत्तर - गट नं. ७५१, ७१६ व ७१२ | |

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकत त्यातील अंगभूत वस्तुसह, जाणे येण्याचे वहिवाटीचे सर्व हक्क व सर्व इजमेंटरी रईट्ससह दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
पारगाव तर्फे खेड
दि. १३/०७/२०२६

सही/-
अॅडव्होकेट
**श्री. किरण सुधीर मते**



# पुणे महानगरपालिका

वरं जनहितं ध्येयम् — पुणे महानगरपालिका | पुणे अद्वितीय & Unique

**उप आयुक्त, परिमंडळ क्र. २**

जाहिरात प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रांचे नाव व दिनांक :- दै. पुणे मिरर व दै. संध्या दि. १३/०७/२०२६

**नवीन कामे जाहिरात**

विक्री कालावधी दिनांक :- १७/०७/२०२६ ते २२/०७/२०२६ वेळ :- दु.०२.३० पर्यंत
स्वीकृती कालावधी दिनांक :- १७/०७/२०२६ ते २२/०७/२०२६ वेळ :- दु.०२.३० पर्यंत
टेंडर उघडणे दिनांक :- २३/०७/२०२६ दुपारी ०३.०० वाजता.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा संच किंमत/शुल्क | अंदाजित पूर्वगणित रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | "कनिष्ठ अभियंता व नाव व भ्रमणध्वनी क्रमांक" |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/102 | मुळारोड येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ४२०८२३ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| २ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/103 | पाटील इस्टेट येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ४२१०१५ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ३ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/104 | पाटकर प्लॉट येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१११४ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ४ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/105 | न.ता.वाडी येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२०६७८ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ५ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/106 | रामोशीवाडी परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | ४१५ | ४२०७७४ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ६ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/107 | प्रभाग क्र ७ मुळारोड येथे ड्रेनेज लाईन बदलणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४४९७२ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ७ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/108 | प्रभाग क्र ७ भैय्यावाडी येथील ड्रेनेज लाईन बदलणे व तदनुषंगिक कामे करणे | ४१५ | ८४४८६२ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ८ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/109 | प्रभाग क्र ७ पाटकर प्लॉट येथील ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४७३८ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ९ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/110 | प्रभाग क्र ७ महात्मा गांधी वसाहत येथील ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४४९३३ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १० | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/111 | प्रभाग क्र ७ विष्णुकृपा सोसायटी येथील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४४७४२ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| ११ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/112 | प्रभाग क्र 12 गोखलेनगर येथील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४९४३ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १२ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/113 | प्रभाग क्र. 12 रामोशीवाडी परिसरातील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे.(नवीन प्रभाग क्र.७) | ४१५ | ८४४८५५ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १३ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/114 | वडारवाडी परीसरामध्ये चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१०८२ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १४ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/115 | शिवाजीनगर गावठाण येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१२४१ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १५ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/116 | पुलाचीवाडी येथे ड्रेनेज चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१०८६ | ५००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १६ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/117 | प्रभाग क्र ७ न.ता.वाडी येथील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४८६८ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १७ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/118 | प्रभाग क्र. 12 पुलाचीवाडी परीसरामध्ये येथील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४९६७ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १८ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/119 | प्रभाग क्र. 12 वडारवाडी परीसरामध्ये येथील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४८०१ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| १९ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/120 | प्रभाग क्र. 12 महालेनगर परीसरामध्ये ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४५००४ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| २० | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/121 | प्रभाग क्र. 12 शिवाजीनगर घोलेरोड परिसरातील ड्रेनेज लाईन बदलणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४४६८८ | १०००० | ९ महिने | श्रीमती वैशाली जाधव ८७९६६१७७३८ |
| २१ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/124 | हेल्थ कॅम्प परिसरातील शौचालय व ड्रेनेज लाईन दुरुस्ती कामे करणे. | ४१५ | ४२३७२३ | ५००० | ९ महिने | श्री. जयेश कांबळे 9689913930 |
| २२ | PMC/ZONE-2/ 2026/ AUNDH/141 | प्रभाग क्र.९ मधील सुस महादेवनगर येथे प्रकाश व्यवस्था करणे. | ४१५ | ४२३६५३ | ५००० | ८ महिने | श्री प्रल्हाद पवार ९६८९९३७६९७ |
| २३ | PMC/ZONE-2/ 2026/ AUNDH/142 | प्रभाग क्र.९ मधील तापकिरवस्ती, बांदलवस्ती येथे प्रकाश व्यवस्था करणे. | ४१५ | ४२३३६५ | ५००० | ८ महिने | श्री प्रल्हाद पवार ९६८९९३७६९७ |
| २४ | PMC/ZONE-2/ 2026/ AUNDH/143 | प्रभाग क्र.९ मधील बाणेर पाषाण लिंक रस्ता, अथश्री रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणे. | ४१५ | ४२३५०० | ५००० | ८ महिने | श्री प्रल्हाद पवार ९६८९९३७६९७ |

**उप आयुक्त, परिमंडळ क्र. २**

जाहिरात प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रांचे नाव व दिनांक :- दै. पुणे मिरर व दै. संध्या दि. १३/०७/२०२६

**फेर निविदा कामे जाहिरात**

विक्री कालावधी दिनांक :- १३/०७/२०२६ ते २०/०७/२०२६ वेळ :- दु.०२.३० पर्यंत
स्वीकृती कालावधी दिनांक :- १३/०७/२०२६ ते २०/०७/२०२६ वेळ :- दु.०२.३० पर्यंत
टेंडर उघडणे दिनांक :- २१/०७/२०२६ दुपारी ०३.०० वाजता.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा संच किंमत/शुल्क | अंदाजित पूर्वगणित रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | "कनिष्ठ अभियंता व नाव व भ्रमणध्वनी क्रमांक" |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/122 | छ. शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१२ मध्ये वृक्ष रोपण, संरक्षण देखभाल विषयक कामे करणे. | ४१५ | ९९९९७९ | १०००० | १० महिने | श्री. शंकर केदारी 9689939716 |
| २ | PMC/ZONE-2/ 2026/ GHOLEROAD/123 | छ. शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.7 मध्ये वृक्ष रोपण, संरक्षण देखभाल विषयक कामे करणे. | ४१५ | ९९९९७९ | १०००० | १० महिने | श्री. शंकर केदारी 9689939716 |
| ३ | PMC/ZONE-2/ 2026/ KOTHRUD/28 | कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत वृक्ष छाटणी व संवर्धन विषयक कामे करणे करिता कंत्राटी पद्धतीने कुशल व अकुशल मजूर पुरविणे | ४१५ | ९९९९६७ | १०००० | १२ महिने | श्री कमलेश नागेश्वर ९८६०८८११७२ |
| ४ | PMC/ZONE-2/ 2026/ KOTHRUD/29 | कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत वृक्षारोपण संरक्षण देखभाल विषयक कामे करणे | ४१५ | ९९९९७९ | १०००० | १२ महिने | श्री कमलेश नागेश्वर ९८६०८८११७२ |
| ५ | PMC/ZONE-2/ 2026/ KOTHRUD/30 | कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मारीगोल्ड व बावधन येथील गणपती विषयक कामे करणे. | ४१५ | ४१८२३२ | ५००० | ७ महिने | श्री भूषण सोनवणे ९८६०३३४०३० |
| ६ | PMC/ZONE-2/ 2026/ KOTHRUD/31 | उस्तवनिमित्त (पालखी ,जयंती, गणेशोत्सव इ.) नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक कामे करणे. | ४१५ | ७७४१२२ | १०००० | १२ महिने | श्री भूषण सोनवणे ९८६०३३४०३० |

अ पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/ म.न.पा. मान्यताप्राप्त/शासन मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडरसेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून, सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून, सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

ड) अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) कार्यालयाकडील कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ(वि)३२ दि. २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस./ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारणेत येणार आहे.

इ) सदर निविदा कार्यपद्धतीमध्ये मा. मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे मनपा यांच्याकडील जा.क्र.मुले/६३०२ दि. ०५/०२/२०२० नुसार सनदी लेखापाल यांचे लेटरहेडवरील Unique Document Identification Number (UDIN) क्रमांक असणे आवश्यक आहे.

ई) महाराष्ट्र शासनाचे महाऑनलाईन निविदा प्रणाली संगणकीकृत असून तांत्रिक अडचणी/ इंटरनेट असुविधा यामुळे निविदा पब्लिशिंगला जर उशिर झाल्यास त्यानुसार निविदा स्वीकृती व उघडणे या तारखा महाऑनलाईन पोर्टलवरून संगणकीकृत आज्ञावली द्वारे निश्चित होतील, त्याप्रमाणेच ग्राह्य राहतील, याबाबत तक्रार चालणार नाही.

उ) मुख्य लेखा व वित्त विभागाकडील जा.क्र. १३०८ दि. ०८/०७/२०२१ च्या कार्यालयीन परिपत्रकान्वये आयकर कायद्यान्वये कलम 206AB व 206CCA द्वारे दि. ०१/०७/२०२१ पासून लागू झाला. त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकाकडे निविदा भरताना निविदाधारकांनी त्यांच्या फर्म/कंपनी/प्रोप्रायटर इत्यादी व्यावसायिक संस्थेच्या ज्या वर्षात निविदा भरताना त्यामागील दोन आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्रक सादर केलेले असेल तर त्याबाबतचे Declaration Table सादर करताना दोन आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्रकाची माहिती देणे बंधनकारक राहील. सदर तरतुदीची अंमलबजावणी न केल्यास आयकर कामाव्दारे TDS वजावटीचा दर ५% गृहीत धरून निविदाधारकांचे बील अदा करण्यात येईल.

सही/-
**उपआयुक्त (परिमंडळ क्र.२)**
**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात क्र. ७-ZMC-२-२०२६ दिनांक :- १०/०७/२०२६**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तडीपार गुन्हेगाराला कोयत्यासह रावेत पोलिसांकडून अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : तडीपार आदेशाचे उल्लंघन करून खुलेआम सार्वजनिक ठिकाणी कोयता बाळगून फिरणाऱ्या एका गुन्हेगाराला रावेत पोलिसांनी अटक केली आहे. प्रेम गोरक्ष साकोरे (वय २४, रा. विठ्ठल रेसिडेन्सी फेज-१, आदर्श नगर, किवळे, ता. हवेली, जि. पुणे) या तडीपार गुन्हेगाराला अटक करण्यात आली आहे. रावेत पोलिसांनी ही कारवाई दि.१० जुलै रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास शिंदेवस्ती ते गणेशनगर जाणाऱ्या ८० फूट डांबरी रस्त्यालगत, व्हिक्टरी क्रिकेट अकॅडमीसमोरील मोकळ्या जागेत केली आहे. रावेत पोलिस ठाण्यातील तपास पथकाचे पोलीस कर्मचारी प्रदीप कामाजी गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीवर १० नोव्हेंबर २०२५ रोजी तडीपारची कारवाई करण्यात आली होती. त्याला पुणे जिल्ह्यातून एक वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले असतानाही तो विनापरवानगी परिसरात आढळून आला. यावेळी त्याच्याकडून सुमारे ८५० रुपये किमतीचा लोखंडी कोयता जप्त करण्यात आला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रावेत पोलीस करत आहेत.



### वायसीएमबाहेर आक्रोश... अश्रूंनी भरला परिसर!

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपोतील भीषण दुर्घटनेनंतर तब्बल ७२ तास सुरू असलेल्या शोधमोहिमेचा दुर्दैवी शेवट यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) परिसरात पाहायला मिळाला. एकामागून एक मृतदेह रुग्णालयात दाखल होताच कुटुंबीयांचा आक्रोश, अश्रू आणि हंबरड्याने संपूर्ण परिसर सुन्न झाला. अनेकांच्या डोळ्यांसमोर आपल्या जिवाभावाच्या व्यक्तीचे पार्थिव येताच वातावरण अधिकच हृदयद्रावक बनले. ११ जुलै रोजी दुपारी २.३० वाजल्यापासून मृतदेह यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात आणण्यास सुरुवात झाली. रात्री ८ वाजेपर्यंत सहा मृतदेह रुग्णालयात दाखल झाले. त्यानंतर १२ जुलै रोजी आणखी एका मृतदेहाचा शोध लागला. अद्याप दोन जणांचा शोध सुरू असल्याने कुटुंबीयांची धाकधूक कायम होती. मृतदेह काळ्या रंगाच्या शवपिशव्यांमधून रुग्णालयात आणले जात होते. त्या क्षणी परिसरात पसरलेली शांतता आणि नातेवाईकांचा हंबरडा उपस्थितांच्या काळजाला चिरणारा होता. काही कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते, तर अनेकजण शब्दही न उच्चारता आपल्या आप्तांच्या प्रतीक्षेत उभे होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. वरिष्ठ पोलिस अधिकारी, डॉक्टर, रुग्णालय कर्मचारी आणि आपत्कालीन यंत्रणा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून होती.मोशी दुर्घटनेने अनेक कुटुंबांचा आधार हिरावून घेतला. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाबाहेर दिसणारे अश्रू, आक्रोश आणि हतबल चेहरे या दुर्घटनेची भीषणता सांगण्यासाठी पुरेसे होते.

### मावळच्या पूरस्थितीला जबाबदार कोण? विकासकामांमुळे वाढला पूराचा धोका?

वडगाव मावळ : चार-पाच दिवसांपासून तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती, दरडी कोसळण्याच्या घटना आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मात्र या आपत्तीला केवळ अतिवृष्टी कारणीभूत नाही. तर गेल्या काही वर्षांत गृहप्रकल्प आणि प्लॉटिंगसाठी नैसर्गिक ओढे-नाले बुजविणे, त्यांचे प्रवाह बदलणे आणि डोंगर फोडून विकासकामे करणे हीदेखील या संकटामागची मोठी कारणे आहेत, असा आरोप नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि शेतकऱ्यांकडून केला जात आहे. गेल्या काही वर्षांत मावळ तालुक्यातील वडगाव मावळ, तळेगाव दाभाडे, सोमाटणे फाटा, कान्हे, जांभूळ, साते, कामशेत तसेच मुंबई-पुणे महामार्गालगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प, प्लॉटिंग योजना आणि व्यावसायिक विकासकामे झाली आहेत. याशिवाय आंदर मावळ परिसरातही डोंगरपायथ्यावरील जागा खरेदी करून फार्महाऊस आणि प्लॉटिंग प्रकल्प उभारण्यात आले. या विकासकामांदरम्यान अनेक ठिकाणी नैसर्गिक ओढे-नाले बुजविण्यात आले, प्रवाहात बदल करण्यात आल्याचा तसेच डोंगरांमध्ये स्फोटकांचा वापर करून खोदकाम करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, विकासकामांसाठी डोंगर कापणे, उतारांवर मातीचा भराव टाकणे आणि नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करणे, यामुळे जमिनीची नैसर्गिक रचना बदलली आहे. परिणामी, मुसळधार पावसात मातीचा धरून ठेवण्याचा नैसर्गिक आधार कमी झाल्याने काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. तसेच पावसाचे पाणी पूर्वीच्या नैसर्गिक मार्गाने न वाहता थेट वसाहती आणि शेतीकडे वळत असल्याने नुकसानाचे प्रमाण वाढत आहे. शहरी भागात उभारण्यात आलेल्या अनेक गृहप्रकल्पांमध्ये बांधकामासाठी अडथळा ठरणारे ओढे आणि नाले बंदिस्त करून त्यामध्ये लहान व्यासाचे पाईप टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. उन्हाळ्यात या पाईपमधून पाण्याचा प्रवाह सहज होतो, मात्र पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्यावर त्यातून निचरा होत नाही. परिणामी, पाणी अडून राहते आणि त्याचा फटका आजूबाजूच्या घरांना, रस्त्यांना आणि शेतांना बसत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.



# शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात - महापौर

**शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम आलेल्या क्षितिजय नप्तेचा सत्कार संपन्न; महात्मा फुले विद्यालयातील शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांची भव्य मिरवणूक**

पिंपरी (दै. संध्या)



भोसरी मधील महात्मा फुले विद्यालय आणि पिंपरी चिंचवड शहरातील शासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात हे अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी केले.

भोसरी येथील महात्मा फुले जागृती संस्थेच्या महात्मा फुले विद्यालयातील क्षितिजय नप्ते याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, त्याचा व इतर यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका मंगल आहेर - गावडे या सर्वांचा सत्कार महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक व भोसरी येथील महात्मा फुले जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंत लोंढे, नगरसेवक विराज लांडे, सोनाली गव्हाणे, माई पठारे, संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत रासकर, शिवलिंग ढवळेश्वर, दिगंबर ढोकळे, मुख्याध्यापक सुलभा चव्हाण, मोहन वाघुले, सुलोचना वसंत लोंढे, शिक्षक, यशस्वी विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. तत्पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांची भोसरी गावठाण परिसरातून मिरवणूक काढण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष श्याम लोंढे, अनिल लोंढे, सोमनाथ रासकर, सचिव संतोष लोंढे, उपसचिव संदीप लोंढे, खजिनदार वृषभ रासकर, सह खजिनदार दीपक लोंढे, महेश लोंढे, हिशोब तपासणीस विजय लोंढे, सह हिशोब तपासणीस अतुल रासकर, सभासद तुषार लोंढे, संकेत लोंढे, सिद्धेश लोंढे, अमित लोंढे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला होता.

यावेळी महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, या संस्थेचे अध्यक्ष नाना लोंढे हे आमचे गुरू आहेत. त्यांनी कामगार, उद्योग, सहकार, व्यापार, अध्यात्म, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आता त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती करायचे ठरवले आहे.

भोसरी मधील विद्यार्थी आता शहरात शैक्षणिक क्रांती करतील असा विश्वास आहे. मी देखील वाबळेवाडी येथील दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या शाळेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून वैयक्तिक खर्चाने एक शाळा विकसित करीत आहे. वाबळेवाडीतील शाळेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३२ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे शाळा बाह्य शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसा पथदर्शी प्रकल्प म्हणून काम सुरू केले आहे. आगामी काळात पिंपरी चिंचवड शहर गुणवंतांचे शहर म्हणून नावारूपाला येईल असा विश्वास महापौर रवी लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी गुणवत्ता यादीतील क्षितीजय नप्ते, वेदांत गोरडे, तनिष्का केदार, वैदिक कदम, ऋग्वेद गावडे, प्रत्यंचा गायकवाड, विणा पाटील, ध्रुव दैन, प्रज्वल काटे, वेदिका बरुरे, हर्षदा खांडेकर, वेदांत बंडगर, अमित कुलुंगे, स्वरा पामलवाड, स्वरा जगताप, ज्ञानेश लांडे, हर्षाली बावा, श्लोक गायकवाड, सार्थक सावंत, श्रेया जगताप, स्वराज शेळके, ईश्वरी टाकसाळ, युगंधरा ठाकूर आणि अनुष्का घाडगे, भावेश कोल्हे तसेच प्रतीक शिंदे (१० वी मध्ये ९५.८५ टक्के गुण) या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

स्वागत, प्रास्ताविक वसंत लोंढे, सूत्र संचालन शरद कर्णवर आणि आभार सुलभा चव्हाण यांनी मानले.

## ट्रॅफिक बडी व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉटला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; एका महिन्यात १,६३८ तक्रारींचे निराकरण

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने नागरिकांच्या वाहतूक विषयक तक्रारी व समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी सुरू केलेल्या 'ट्रॅफिक बडी' ऑनलाइन व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. जून २०२६ या एका महिन्यातच या चॅटबॉटच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या १,६३८ तक्रारींचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वाहतूक कोंडी, वाहतूक नियमांचे उल्लंघन तसेच इतर वाहतूक विषयक समस्यांबाबत नागरिकांना थेट तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

वाहतूक पोलिसांकडे प्रत्यक्ष जाण्याऐवजी नागरिकांना घरबसल्या व्हॉट्सअ‍ॅपद्वारे तक्रार नोंदविता यावी, यासाठी ८७८८६४९८८५ हा ट्रॅफिक बडी चॅटबॉट क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख नयांनी गरिकांना आवाहन केले आहे की, वाहतूक कोंडी, नियमभंग किंवा इतर वाहतूक विषयक अडचणींबाबत तक्रार नोंदविण्यासाठी ट्रॅफिक बडी चॅटबॉटचा जास्तीत जास्त वापर करावा.

## कचऱ्याच्या ढिगाऱ्याशेजारी इमारतीला परवानगी कशी दिली? दोषींवर कारवाई करावी, श्रीरंग बारणेंची मागणी

पिंपरी (दै. संध्या)



मोशीतील कचऱ्याच्या ढिगाऱ्याशेजारी प्रशासकीय इमारतीला परवानगी कशी देण्यात आली? अशा ठिकाणी इमारत बांधणे चुकीचे आहे. परवानगी देताना नियमांचे पालन केले आहे का? या प्रकरणाची सखोल चौकशी करून ठेकेदार, दोषी असलेल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशीतील कचरा डेपोतील कचऱ्याच्या डोंगर 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या तीन मजली इमारतीवर पडल्याने इमारत कोसळली. एका महिलेसह १८ कामगार इमारतीखाली अडकले होते. त्यापैकी नऊ जणांना बाहेर काढले असून, एकाचा मृत्यू झाला. सात जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. खासदार बारणे यांनी मोशीला जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. बचाव कार्याची माहिती घेतली. शिवसेनेचे गटनेते विश्वजीत बारणे, ज्येष्ठ नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक निलेश तरस, बापू कातळे यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहरातील संपूर्ण कचरा एकत्रित करून मोशी डेपोत अनेक वर्षांपासून टाकला जातो. तिथे डोंगर तयार झाला आहे. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प होण्यापूर्वीचे हे डोंगर आहेत. कचरा संकलन, प्रक्रिया यावर महापालिका कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. डोंगर तयार झाल्यानंतर 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारण्यात आला आहे. नियमानुसार ही इमारत बांधली आहे का? याची चौकशी करावी.

## सांगवी वाहतूक विभागातील पोलिसांना उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने 'रिफ्लेक्टरयुक्त रेनकोट'चे वाटप

सांगवी (दै. संध्या)




पावसात नागरिकांच्या सेवेसाठी रस्त्यावर उभे राहून वाहतूक सुरळीत ठेवणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या सुरक्षिततेची जबाबदारी समाजानेही उचलली पाहिजे, या भावनेतून उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने सांगवी वाहतूक विभागातील पोलिसांना रिफ्लेक्टरयुक्त रेनकोटचे वाटप करण्यात आले. पावसाळ्यात मुसळधार पाऊस, कमी दृश्यमानता आणि प्रतिकूल परिस्थितीत वाहतूक नियमन करणाऱ्या पोलिसांचे काम अधिक आव्हानात्मक असते. अशा परिस्थितीत त्यांना संरक्षण मिळावे तसेच रिफ्लेक्टरयुक्त रेनकोटमुळे रात्रीच्या वेळी त्यांची दृश्यमानता वाढून सुरक्षितता अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामागील संकल्पना विशद करताना उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा नगरसेविका कुंदा संजय भिसे म्हणाल्या, "वाहतूक पोलीस कोणत्याही हवामानाची पर्वा न करता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर उभे राहून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतात. त्यांच्या सेवेला कृतज्ञतेची सलामी म्हणून हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजसेवा आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याचा आम्हा सर्वांचा छोटासा प्रयत्न आहे. समाजासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आपणही संवेदनशील राहिले पाहिजे. या उपक्रमाला सहकार्य केल्याबद्दल सांगवी वाहतूक विभागाचे मनःपूर्वक आभार. समाजासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक घटकाच्या सुरक्षिततेसाठी उन्नती सोशल फाउंडेशन भविष्यातही अशाच लोकहिताच्या उपक्रमांचे आयोजन करत राहील."

## मुसळधार पावसाने पवन मावळ बहरला; डोंगरदऱ्या हिरवाईने नटल्या

पवनानगर (दै. संध्या)

संततधार आणि मुसळधार पावसाने संपूर्ण पवन मावळ परिसर अक्षरशः जलमय झाला आहे. या पावसामुळे एकीकडे जनजीवनावर परिणाम झाला असला, तरी दुसरीकडे निसर्गानेही आपले मनमोहक आणि विलोभनीय रूप धारण केले आहे.

डोंगरदऱ्या हिरवाईने नटल्या असून कड्याकपाऱ्यांतून कोसळणारे असंख्य धबधबे पर्यटकांना खुणावत आहेत. परिणामी, मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि लोणावळा परिसरातून हजारो पर्यटकांनी पवन मावळकडे धाव घेतली आहे.

मावळ तालुक्यात गेल्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे ओढे, नाले आणि लहान-मोठे जलस्रोत तुडुंब भरून वाहू लागले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी आले असून सखल भागांत वाहतुकीवर परिणाम झाला आहे. मुसळधार पावसाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम तालुक्यातील प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यावर झाला.

पवना, आंद्रा आणि वडीवळे धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पर्जन्यवृष्टीमुळे धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने वाढू लागला आहे. यामुळे आगामी काळातील पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न सुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'राम नाम जपना, पराया माल अपना' हेच भाजपचे धोरण - काँग्रेसची टीका

पिंपरी (दै. संध्या)

अयोध्या मधील श्रीराम मंदिरातील संघटित दरोडा प्रकरणी काँग्रेसचे महाराष्ट्रात विविध ठिकाणी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन सुरू आहे या अंतर्गत पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसकडून, चिंचवड येथील राम व हनुमान संयुक्त मंदिराजवळ जाऊन प्रार्थनेद्वारे, सत्य समोर आणून कारवाईची मागणी करणारे 'रघुपति राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन' करण्यात आले. या ठिकाणी असलेल्या सर्व देवतांचे पूजन करून सुरू झालेल्या या आंदोलनामध्ये सुरुवातीला रघुपती राघव राजाराम या सामूहिक भजन गाना ने सुरुवात करण्यात आली, त्यानंतर खरा तो एकची धर्म हे प्रार्थना गीत सामुहिक स्वरूपात गाण्यात आले.

याप्रसंगी बोलताना प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी म्हणाले, "अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिर ट्रस्ट मध्ये ४० दिवसांच्या सीसीटीव्हीतून ७० वेळा झालेल्या देणगी, निधी, पैशांची चोरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालया कडून चौकशीची मागणी करणे, आंदोलन करणे ही राम मंदीर, अयोध्या वा हिंदूंची बदनामी नसुन रामा प्रती श्रद्धा व आस्था असलेल्यांच्या भावनेप्रती कर्तव्यपुर्ती आहे

ते पुढे म्हणाले की, लाखो भाविकांनी श्री रामा प्रती श्रद्धा व आस्थेने दिलेले दान, देणगी यांची सुरक्षा बेमालूनपणे खुंटीला टांगून राजरोसपणे होत असलेल्या पैशाची व संपत्तीची लूट ही 'रामा'प्रती श्रद्धा व आस्था बाळगणाऱ्यांचा विश्वासघात असून या विषयीचे पंतप्रधानांचे अद्याप मौन हा अधर्माचा, असंवेदनशीलतेचा व मुजोरीपणाचा कळस आहे किमान या विषयी भाविकांच्या श्रध्दा व आस्था लक्षात घेऊन कडक कारवाई करण्याचे साधे वक्तव्य ही राम मंदीर ट्रस्ट"ची नियुक्ती - घोषणा, प्रतिष्ठापना ते उद्घाटन करणारे भाषणजीवी व श्रेयजीवी पंतप्रधान ३ आठवडे झाले तरी करू शकत नाही हे देशाचे दुर्दैव आहे.




काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले, "कसम राम की खाते है मंदिर वही बनायेंगें, या राम मंदिराच्या मुद्द्यावर फार काळ सुरू ठेवलेल्या राजकारणाला भाजपने मंदिर लुटीपर्यंत नेऊन आपला उद्देश रामाच्या नावाने सत्ता मिळवून रामाचीच लूट करून खिसे भरण्याची आहे हे दर्शवून दिले आहे, 40 दिवस सातत्याने 70 दरोडे पडत असताना तिथे ट्रस्टमध्ये असणारे भाजपचे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक काय करत होते ? का त्यांचाही सहभाग याच्यामध्ये आहे? याची चौकशी होणे गरजेचे आहे."चोरी और उपर सीना जोरी" असं काम सध्या सुरू असल्याचे दिसून येत आहे याची विशेष चौकशी होऊन चोरांना कडक शासन झालेच पाहिजे"

गांधीवादी विचारवंत बी.आर. माडगूळकर म्हणाले, "अयोध्येतील राम मंदिराच्या तिजोरीतून झालेली पैशाची लूट ही अतिशय लांच्छ नास्पद बाब आहे. "मुह मे राम और बगल मे छुरी" या प्रवृत्तीच्या लोकांच्या हातात सत्ता गेल्यामुळे हे घडले आहे. हिंदू हिताची बात करणारे लोक आता हिंदू अहिताची कृती करत आहेत. हे लोक रामभक्त नसून नथुराम भक्त आहेत"

याप्रसंगी प्रदेश काँग्रेसचे सचिव अशोक मोरे, हिराचंद जाधव, अभिमन्यू दहीतुले, राहुल शिंपले, जितेंद्र छाबडा, बी.आर. माडगूळकर यांनी मनोगते व्यक्त केली. आंदोलन प्रसंगी काँग्रेस शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, प्रदेश प्रवक्ते गोपाळदादा तिवारी, प्रदेश सचिव अशोक मोरे, एन एस यु आय चे नेते अक्षय कांबळे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यू दहीतुले, माजी नगरसेवक रामचंद्र माने, सेवादलाचे ज्येष्ठ नेते अशोक मंगल, पुणे जिल्हा सेवादल कार्याध्यक्ष पांडुरंग जगताप, सेवा दलाचे माजी अध्यक्ष वीरेंद्र गायकवाड, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत बी.आर.माडगूळकर, काँग्रेसचे माजी सरचिटणीस हरीश डोळस, हिराचंद जाधव, राहुल शिंपले, अनुसूचित जाती विभागाचे माजी अध्यक्ष विजय ओव्हाळ, जितेंद्र छाबडा, सुरज गायकवाड, रोहित भाट, कबीर मोहम्मद, संदीप शिंदे, संदेश जगताप, नासिर चौधरी, भास्कर नारखेडे, गुंगा शिरसागर, विल्यम साळवी, दीपक भंडारी, विलास सकट, नितीन सोनवणे, रितिका शर्मा, प्रवीण कांबळे, सुरज कोथिंबीरे, देवदत्त रानवडे,अलोक लाड, विवेक विधाते, सिल्वराज अँथोनी, साहेबराव खरात आदी उपस्थित होते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने सत्त्याग्रह समारोप करण्यात आला.

# संत तुकाराम महाराज पालखीचे पालखी कदमवाकवस्ती येथे उत्साहात स्वागत

लोणी काळभोर (दै. संध्या)

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाचे लोणी काळभोर कदमवाकवस्ती येथे भव्य स्वागत करण्यात आले. पालखीचे आगमन होताच पुष्पवृष्टी करण्यात आली. भक्तीमय व चैतन्यमय वातावरणात सायंकाळी ६.३० मिनिटांनी हा सोहळा पालखी तळावर विसावला.

त्या आधी पुणे शहरातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर ग्रामीण भागातील पहिल्या मुक्कामासाठी पुणेकरांनी पालखीला निरोप दिला.

एक प्रचंड मोठा आध्यात्मिक सोहळा. भक्तीचं मूर्त रूप म्हणजे विठ्ठल आणि आर्त रूप म्हणजे वारी... जीवनाचं सासर म्हणजे वास्तविक जीवन तर माहेर म्हणजे विठोबा... म्हणूनच पंढरीच वर्णन माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्यातीरी असे केले जाते. महाराष्ट्राच्या जीवनाला नैकिकतेचे अधिष्ठान देणारा हा सोहळा लाखों वैष्णवांसह आळंदीहून पंढरीच्या दिशेने चालू लागला. जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात ४००दिंड्या असून पालखीच्या पुढे १६दिंड्या तर पाठीमागे ३८४ दिंड्या असून पालखी सोहळ्यात सुमारे तीन लाख

वारकरी असल्याची माहिती असल्याची माहिती अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, सोहळा प्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे, अभिजित महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, विश्वस्त दिलीप महाराज मोरे व महाराज मोरे यांनी दिली.

संतश्रेष्ठ जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा लोणी काळभोर कदमवाकवस्ती येथील सुमारे सोळा एकर प्रशस्त जागेत मुक्कामी आहे. गेल्या पंधरा दिवसापासून दोन्ही प्रशासनाच्या वतीने जोरदार तयारी सुरु होती.

पिण्याचे पाणी, तातडीच्या वैद्यकीय सुविधेसाठी रुग्णवाहिका तसेच पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरते शौचालयांची व्यवस्था करण्यात आली. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वारकऱ्यांच्यासाठी १५ हजार स्क्वेअर फुट जर्मन तंबूची उभारणी करण्यात आली आहे. यावेळी लोणी काळभोर आरोग्य केंद्राच्या मदतीने वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. तसेच पुर्व हवेली डॉक्टर असोसिएशनच्या वतीने वारकऱ्यांच्या आरोग्याची व डोळयांची मोफत तपासणी



करून औषधे देण्यात आले. कवडीपाट येथे पालखी येताच शिरुर - हवेलीचे आमदार माऊली कटके यांनी पालखीचे स्वागत केले. यावेळी अनेक मंडळांनी वारकऱ्यांना खाद्य पदार्थांचे वाटप केले.

सायंकाळी ६.१५ मिनीटांनी पालखी सोहळ्याने पुणे - सोलापूर महामार्ग सोडून कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील पालखी तळाकडे मार्गक्रमण केले त्यावेळी सर्व वारकरी टाळमृदूंगाच्या ठेक्यावर बेधुंद होवून नाचत होते. यावेळी वरुणराजाने विश्रांती घेतली होती. टाळ - मृदुंगाच्या झंकाराने संपुर्ण आसमंत निनादून गेला होता. काही जण फुगड्या खेळत होते तर काहींनी मानवी मनोरे उभारून भागवत धर्माची पताका आसमंतात फिरवून आपला आनंद व्यक्त केला. त्याच अपुर्व उत्साहांत कदमवाकवस्ती व लोणी काळभोर ग्रामस्थांनी त्यांचे फुलांच्या वर्षावांत स्वागत केले. यावेळी दुतर्फा नागरिक दर्शनासाठी उभे होते.

पालखी सोहळा पालखी तळावर मुक्कामी पोहोचल्यानंतर आरती झाली. यावेळी हवेलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार तृप्ती कोलते, सभापती युवराज काकडे, जिल्हा परिषद सदस्या शितल कांबळे, सदस्य मनोज चौधरी, अमोल टेकाळे, प्रशासक सरपंच नागेश काळभोर, हवेली बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, माजी उपसभापती युगंधर काळभोर, उपसरपंच नासिरखान पठाण, माजी सरपंच भरत काळभोर, राहुल काळभोर, नंदकुमार काळभोर, माधुरी काळभोर, सदस्य अविनाश बडदे मंडल अधिकारी लक्ष्मण भांडे, रूपाली सरतापे, माधुरी बागले (उरुळी कांचन), तसेच लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, उरुळी कांचन, अष्टापुर नायगाव पेठ, सोरतापवाडी, वाघोली , थेऊर, वाघोली, शिंदवणे, वाडेबोल्हाई, येथील ग्राममहसुल अधिकारी तसेच पोलीस पाटील दादा काळभोर, प्रियंका भिसे आदी उपस्थित होते. लोणी काळभोर महावितरणचे सहाय्यक अभियंता विक्रांत ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी वीज पुरवठा खंडित न होण्यासाठी चोख व्यवस्था बजावली.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### ज्ञानवर्धिनी विद्यालयात ओळख श्री ज्ञानेश्वरीची उपक्रम उत्साहात संपन्न

चाकण (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान, संत ज्ञानेश्वर चरित्र समिती व संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांच्या संकल्पनेतून चाकण येथे ज्ञानवर्धिनी विद्यालयात ओळख श्री ज्ञानेश्वरीची उपक्रम उत्साहात संपन्न झाला. येथील स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ओळख श्री ज्ञानेश्वरीची या संस्कारमूल्य जोपासणाऱ्या उपक्रमाचा शुभारंभ डॉ. वाघे यांच्या हस्ते झाला. यावेळी संत ज्ञानेश्वर चरित्र समितीचे अध्यक्ष हभप. प्रकाश तात्या काळे, प्रवर्तक सुभाष महाराज गेठे, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी सन २०२३ पासून या उपक्रमास सुरुवात केली. संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार, ज्ञानेश्वरीचे महत्त्व व विद्यार्थ्यांच्या जीवनात संस्कार, अध्यात्म व नैतिक मूल्यांची जोपासना करणे अपेक्षित आहे. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, माधुरी गोरे, सचिन आभाळे, सुवर्णा चौधरी, स्वाती काळे, वंदना बकाल आदी उपस्थित होते. स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांनी शाळा सुरु करताना मुलांना शिक्षणाबरोबर संस्कारक्षम शिक्षण देणे ही संकल्पना व ध्येय समोर ठेवले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून हा उद्देश विद्यार्थ्यांना श्री ज्ञानेश्वरीचा परिचय करून देणे, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि संस्कारक्षम समाज घडविणे हा आहे." प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

### इंडियन रोझ फेडरेशनचे माजी अध्यक्ष रामराव जगताप यांचे निधन

जेजुरी (दैनिक संध्या) : इंडियन रोझ फेडरेशन, पुणे रोझ सोसायटी तसेच श्री मल्हार शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष, वैज्ञानिक रामराव सर्जेराव जगताप यांचे वृध्पकाळामुळे निधन झाले. पुरंदर तालुक्यातील कोथळे जन्मगाव असणारे रामराव जगताप यांनी पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोग शाळेत वैज्ञानिक म्हणून काम केले. क्रोमाटोग्राफी साठी लागणारी सूक्ष्म



रसायने तयार करणारा ब्रॅदर्स केमिकल्स हा रासायनिक कारखाना सुरू केला होता. गुलाब आणि बांधकाम क्षेत्रात आवड असल्याने त्यांनी गुलाब लागवड करून रोपवाटिका सुरू केली. ग्लाडियर, सुधांशू, रिचा, फ्लोरिबंदा, चंद्रलेखा आदी गुलाबाच्या संकरित जातींची त्यांनी निर्मिती केली. तसेच जगातील अनेक प्रमुख वनस्पतींची त्यांनी निर्मिती केली. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना वर्ड रोझ फेडरेशनकडून गार्डन ऑफ एक्सलान्स हा बहुमान मिळाला होता. त्यांच्या जगताप नर्सरीला पुणे रोझ सोसायटी, बॉम्बे रोझ सोसायटी, विजय पोकर्णा, या संस्थेच्या वतीने सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले होते.पुरंदर तालुक्यातील कोथळे येथील ग्रामीण भागातील श्री मल्हार शिक्षण मी मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांनी काम पाहिले होते. त्यांच्या मागे दोन मुले, सूना नातवंडे असा परिवार आहे.

### खालुंब्रे येथे बुधवारी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

चाकण (दैनिक संध्या) : पुष्पलता डी. वाय. पाटील हॉस्पिटल आंबी, प्राथमिक आरोग्य केंद्र करंजविहीरे व उपकेंद्र खालुंब्रे आणि ग्रामपंचायत खालुंब्रे यांच्या संयुक्त विद्यमाने खालुंब्रे (ता. खेड) येथे बुधवारी (दि.१५) मोफत आरोग्य तपासणी शिबिर व औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. उपकेंद्र खालुंब्रे येथे बुधवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जनरल मेडिसिन, बालरोग तपासणी, हाडांची तपासणी, कान, नाक व घसा तपासणी, वजन तपासणी, स्त्रियांच्या विविध आजारांची तपासणी, योग्य आहार मार्गदर्शन, रक्तातील साखर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी करण्यात येणार आहे.

### सरसकट कर्जमाफी व अतिवृष्टी नुकसान भरपाईसाठी किसान सभेचे आंदोलन

मंचर (दैनिक संध्या) : शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती नुकसानीची तातडीने भरपाई द्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, आंबेगाव तालुका समितीच्या वतीने शुक्रवारी घोडेगाव ता.आंबेगाव येथील तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी घोषणाबाजी करून तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शेतमालाला हमीभाव मिळत नसणे, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.सरसकट कर्जमाफीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक मुख्यमंत्री कार्यालयाच्या हस्तक्षेपामुळे होऊ न शकल्याचा आरोप करत अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांच्या आवाहनानुसार राज्यभर आंदोलन करण्यात येत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

# नारायणगाव येथील पूरग्रस्त कातकरी कुटुंबाला मदतीचा हात

नारायणगाव (दै. संध्या)

मीना नदीला आलेल्या पुरामुळे वारूळवाडी येथील श्री वेताळ बाबा मंदिराशेजारी वास्तव्यास असलेल्या कातकरी समाजातील एका कुटुंबाचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या पुराच्या पाण्यामुळे घरातील संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य, कपडे तसेच दैनंदिन वापराच्या अत्यावश्यक वस्तू वाहून गेल्याने या कुटुंबासमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला.

पूर ओसरल्यानंतर या कुटुंबाची अत्यंत बिकट परिस्थिती लक्षात येताच विविध स्तरांतून मदतीचा ओघ सुरू झाला. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत श्री इमरान आतार यांनी संबंधित कुटुंबाच्या तात्पुरत्या निवासासाठी शेडची व्यवस्था करून दिली आहे. त्याचबरोबर रोटरी क्लब, नारायणगाव यांच्या वतीने सलग तीन दिवस भोजनाची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे संकटग्रस्त कुटुंबाला तातडीचा दिलासा मिळाला.

दरम्यान, नारायणगाव पोलीस स्टेशनने पूरग्रस्त कुटुंबाच्या मदतीसाठी समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांना सहकार्याचे आवाहन केले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नारायणगाव येथील उद्योजक श्री संदीप गांधी, अर्थसंपदा नागरी पतसंस्थेचे संस्थापक श्री रमेश मेहेत्रे तसेच वारूळवाडी येथील उद्योजक श्री अभयशेठ कोठारी यांनी पुढाकार घेत कुटुंबाला महिनाभर



पुरेल इतके किराणा साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

या मदतीमध्ये तांदूळ, गहू, डाळी, साखर, खाद्यतेल, मसाले, चहा, मीठ तसेच इतर आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला. त्यामुळे पूरामुळे उद्भवलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी संबंधित कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे.

या संपूर्ण मदतकार्यामध्ये नारायणगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रवीण सपांगे, पोलीस अधिकारी जगदीश पाटील,मंगेश लोखंडे तसेच वारूळवाडी गावचे पोलीस पाटील तथा आपदा मित्र सुशांत भुजबळ यांनी समन्वय साधून मोलाची भूमिका बजावली. विविध सामाजिक संस्था, उद्योजक आणि नागरिक यांच्यातील समन्वयामुळे मदत अल्पावधीत पूरग्रस्त कुटुंबापर्यंत पोहोचू शकली.

संकटाच्या काळात समाजातील संवेदनशीलता, सामाजिक उत्तरदायित्व आणि परस्पर सहकार्याची भावना जिवंत असल्याचे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आपत्तीच्या प्रसंगी प्रशासन, सामाजिक संस्था, उद्योजक आणि नागरिक यांनी एकत्र येऊन केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे गरजू कुटुंबांना नव्याने उभे राहण्याचे बळ मिळत असल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

# कुकडी प्रकल्पात ४२.४१ टक्के पाणीसाठा

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कुकडी प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात समाधानकारक स्थिती निर्माण झाली आहे. चालू पावसामुळे कुकडी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या प्रमुख धरणांमधील एकूण उपयुक्त पाणीसाठा ४२.४१ टक्क्यांवर पोहोचला आहे.

आगामी काळात जर पावसाचा जोर असाच कायम राहिला, तर या पाणीसाठ्यात आणखी मोठी वाढ होण्याची शक्यता पाटबंधारे विभागाने वर्तवली आहे.

कुकडी प्रकल्पातील धरणनिहाय पाणीसाठ्याची आकडेवारी - येडगाव धरण: प्रकल्पातील येडगाव धरणात सर्वाधिक म्हणजे ९८.०६ टक्के पाणीसाठा झाला असून हे धरण पूर्ण भरण्याच्या मार्गावर आहे. वडज धरण: ८९.४७ टक्के



पाणीसाठा. डिंभे धरण: ४८.८० टक्के पाणीसाठा. माणिकडोह धरण: ३३.५३ टक्के पाणीसाठा. पिंपळगाव जोगे धरण: ३.०७ टक्के पाणीसाठा. कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव यांच्याकडून १० जुलै सायंकाळी ४ वाजताच्या मिळालेल्या धरण अहवालानुसार, प्रकल्पातील एकूण उपयुक्त पाणीसाठा सध्या १२५५८.६६ दलघफू (४२.४१ टक्के) इतका आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा १४३००.७२ दलघफू (४८.११ टक्के) एवढा होता, म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा पाणीसाठा ५.७ टक्के कमी आहे.

धरण क्षेत्रात झालेल्या नवीन आवकेमुळे पाणी पातळी वेगाने वाढली आहे. सध्या काही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. पावसाचा जोर वाढल्यास धरणांमधून नदीपात्रात पाणी सोडण्याची शक्यता लक्षात घेता, नदीकाठच्या शेतकऱ्यांना आणि नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन कुकडी पाटबंधारे विभागाने केले आहे.

# नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे, प्रशासनाचे दुर्लक्ष

राजगुरुनगर (दै. संध्या)

दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजगुरुनगर येथील जुन्या काळातील हौद ओढा प्रथमच ओव्हरफुल झाल्याने, पाण्याची पातळी थेट पुलापर्यंत येऊन ठेपली होती. प्रचंड वेगाने आलेल्या पाण्याचा प्रवाह पुलावरून गेल्याने या पुलाच्या सुरक्षिततेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.



स्थानिकांच्या मते, ओढ्यालगत झालेली बांधकामे अरुंद झालेले पात्र आणि नैसर्गिक जलप्रवाहातील अडथळे ही परिस्थिती निर्माण होण्यामागील प्रमुख कारणे असली तरी प्रशासनाकडून नाले व ओढ्यांची वेळेत सफाई न होणे, बंद पडलेल्या मोऱ्या, वाहून आलेला कचरा, गाळ व राडारोडा यामुळे पुलाखालून पाणी सुरळीत वाहून जाण्याऐवजी त्याचा प्रवाह पुलावरून वाहू लागला होता.

नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यावर असलेला इतिहास कालीन हौद ओढा पूर्ण क्षमतेने भरून वाहत होता.या ओढ्यातील काही मोऱ्या बंदिस्त अवस्थेत असून केवळ एकच मोरीतून पाण्याचा प्रवाह निघत असताना पाण्याच्या प्रवाहात वाहून आलेला कचरा,राडारोडा ही एकमेव मोरीला अडथळा ठरत होता.

मनुष्याच्या हस्तक्षेपामुळे तालुक्यातील अनेक भागात नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने पावसाळ्यात सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असून मोऱ्या बंद करणे, ओढे-नाल्यांच्या पात्रावर अतिक्रमण करणे, प्रवाहाची रुंदी कमी करणे तसेच नैसर्गिक निचऱ्याचे मार्ग अडवणे यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी परिसरात साचते. परिणामी पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन घरे, दुकाने, शेती आणि रस्त्यांचे मोठे नुकसान होत आहे. भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी नैसर्गिक जलप्रवाह कायम ठेवणे, अतिक्रमणे हटवणे आणि पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची प्रभावी व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# चाकण बाजारात चवळी, शेवगा, भेंडी, दोडका व कारल्याची उच्चांकी आवक

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये चवळी, शेवगा, भेंडी, फ्लावर, दोडका, कारली व हिरव्या मिरचीची उच्चांकी आवक झाली. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ६० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ५०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,००० ते २,७०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,६०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १५ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३३५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ते ५ हजार



५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,७०० रुपये, भाव क्रमांक २.२,००० रुपये, भाव क्रमांक ३.१,०००. बटाटा - एकूण आवक - १,६०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये, भाव क्रमांक ३.९०० रुपये. फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३४२ क्विंटल (१,००० ते २,५०० रू.), कोबी - २१५ क्विंटल (८०० ते १,५०० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ८६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), भेंडी - ६८ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), दोडका - ६५ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), कारली - ६२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), दुधीभोपळा - ५० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - १०९ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ६ क्विंटल (७,००० ते १२,००० रु.), वालवड - १४ क्विंटल (६,००० ते ८,००० रुपये), ढोबळी मिरची - १५० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - २८ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), वाटाणा - १५ क्विंटल (१२,००० ते १५,००० रू. ), शेवगा - ३० क्विंटल (४,००० ते ५,५०० रु.), गाजर - १४० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ५० क्विंटल (४,००० ते ६,००० रु. ), आले - १७५ क्विंटल (८,००० ते १३,००० रु. ).

## आश्रमशाळांमध्ये अळ्यायुक्त जेवण, अधिकाऱ्यांकडून राजम्याचे मोड असल्याचा बनाव

जुन्नर (दै. संध्या)

गोरगरीब, वंचित आदिवासी मुलांच्या जिवाशी खेळणारा संतापजनक प्रकार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्या कार्यक्षेत्रात समोर आला आहे. जुन्नर तालुक्यातील सोमतवाडी आदिवासी कन्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अळ्यायुक्त निकृष्ट अन्न दिल्याचे उघड झाले आहे. मात्र त्या अळ्या नसून राजम्याचे मोड (अंकुर) आहेत, असा दावा करून हा प्रकार दडपण्याचा प्रकार शासकीय अधिकाऱ्यांकडून होत आहे. सुकाळवेढे येथील सरपंच दत्ता गवारी यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत मिळवलेल्या अधिकृत कागदपत्रांमुळे खोटा अहवाल पुढे आला आहे.

३० सप्टेंबर २०२५ रोजी जुन्नर तालुक्यातील सोमतवाडी येथील शासकीय कन्या आश्रमशाळेत जेवणाची तपासणी केली असता, राजमा भाजीमध्ये अळ्या आढळल्या होत्या. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांनी सेंट्रल किचन तपासणीचा फार्स केला. नंतर दिलेल्या अहवालात त्यांनी, भाजीत अळ्या नव्हे तर राजम्याचे अंकुर होते, असे नमूद केले आहे. या अहवालाचा आधार घेऊन प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी अप्पर आयुक्त, ठाणे यांना भाजीत अळ्या नसल्याचा अहवाल पाठवला. कोट्यवधींचे कंत्राट घेणाऱ्या ठेकेदाराला वाचवण्यासाठी वरिष्ठ अधिकारी संगनमताने काम करत असल्याचा आरोप दत्ता गवारी यांनी केला आहे.

प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अहवालात प्रदीप देसाई यांनी हे प्रकरण केवळ एका शाळेपुरते मर्यादित असल्याचे भासवले होते. परंतु, शासकीय कागदपत्रांनी हा दावा खोटा ठरवला आहे. ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२५ रोजी एकाच वेळी तब्बल ७ शासकीय आदिवासी आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांनी राजम्याच्या भाजीत अळ्या सापडल्याचा अहवाल दिला होता.

# खासदार विनायक राऊत यांच्या सुनेच्या तक्रारीची गंभीर दखल

## पीडितेशी व तिच्या वकिलांशी थेट संवाद साधत दिला धीर : निष्पक्ष चौकशी व कठोर कारवाईची डॉ. गोऱ्हे यांची पोलीस महासंचालकांना निवेदनाद्वारे मागणी

■ मुंबई (दै. संध्या)

खासदार विनायक राऊत यांच्या सून गिरीजा राऊत यांनी पती गीतेश राऊत, सासरे विनायक राऊत, शामल राऊत तसेच अन्य संबंधित व्यक्तींविरोधात मानसिक छळ आणि कौटुंबिक अत्याचाराचे गंभीर आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची शिवसेना नेत्या व विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात डॉ. गोऱ्हे यांनी पोलीस महासंचालकांना लेखी निवेदन देखील दिले आहे.

शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी वर्षा जितेंद्र मोरे यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क घडवून आणल्यानंतर डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गिरीजा राऊत यांच्याशी सविस्तर संवाद साधला. यावेळी गिरीजा राऊत यांनी त्यांच्यावर झालेल्या कथित मानसिक छळासह संपूर्ण घडामोडींची माहिती डॉ. गोऱ्हे यांना दिली. डॉ. गोऱ्हे यांनी त्यांना धीर देत, "या लढ्यात तुम्ही एकट्या नाही. आम्ही तुमच्या पाठीशी



खंबीरपणे उभे आहोत. तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल," असा विश्वास दिला.

संवादादरम्यान गिरीजा राऊत यांनी डॉ. गोऱ्हे महिलांसाठी राबवत असलेल्या 'स्वमदत गट' संकल्पनेचे विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे संकटग्रस्त महिलांना मानसिक आधार, आत्मविश्वास आणि न्यायासाठी लढण्याची ताकद मिळते. महिलांना सक्षम करण्यासाठी अशा संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले. याखेरीज डॉ. गोऱ्हे यांनी गिरीजा राऊत यांच्या वकिलांशीही दूरध्वनीद्वारे संपर्क साधून प्रकरणाच्या कायदेशीर बाजूची सविस्तर माहिती घेतली. या प्रकरणात कोणत्या कायदेशीर तरतुदी लागू होऊ शकतात, पुरावे अधिक सक्षमपणे कसे मांडता येतील आणि प्रकरण अधिक भक्कम करण्यासाठी कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी चर्चा केली. यावेळी गिरीजा राऊत यांना सरकारी वकील नियुक्त करण्यात आल्याची माहिती वकिलांनी डॉ. गोऱ्हे यांना दिली. त्यामुळे प्रकरण अधिक सक्षम, निष्पक्ष आणि प्रभावीपणे न्यायप्रक्रियेत पुढे जाण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "महिलेने केलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. प्रत्येक पीडित महिलेला न्याय मिळणे ही शासन आणि यंत्रणांची जबाबदारी आहे. या प्रकरणाची कोणताही राजकीय दबाव न येता सखोल आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी आढळणाऱ्या कोणालाही कायद्यापासून संरक्षण मिळता कामा नये." उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या 'लाडक्या सुनेचे रक्षण' धोरणाचा उल्लेख करत डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, राज्यातील प्रत्येक सून सुरक्षित असल्याची भावना निर्माण करण्यासाठी अशा धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महिलांवरील मानसिक, शारीरिक किंवा सामाजिक अत्याचाराच्या प्रत्येक प्रकरणात शासनाने संवेदनशील आणि ठोस भूमिका घेतली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, "गिरीजा राऊत यांच्यासारख्या महिलांनी स्वतःवर होणाऱ्या अन्यायाविरोधात निर्भीडपणे आवाज उठवला, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. घरातील राजकीय किंवा आर्थिक दबावाची पर्वा न करता त्यांनी तक्रार दाखल करण्याचे धाडस दाखवले आहे. अशाच प्रकारे अन्याय सहन करणाऱ्या प्रत्येक महिलेने पुढे येऊन कायद्याची मदत घ्यावी. वेळेत आवाज उठविल्यास कौटुंबिक हिंसाचारामुळे महिलांना टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येणार नाही. अन्याय सहन करण्यापेक्षा त्याविरोधात लढणे हेच खरे धैर्य आहे आणि अशा प्रत्येक महिलेला समाज व शासनाचा आधार मिळालाच पाहिजे."

# लाड-पागे समितीच्या शिफारसींनुसार सुमारे ५०० लोकांना लवकरच नियुक्तीचे आदेश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महर्षी वाल्मिकी वसाहत आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 'स्वप्नपूर्ती' सदनिका प्रकल्पाचे भूमिपूजन

■ नागपूर (दै. संध्या)

सफाई कर्मचाऱ्यांसह समाजातील प्रत्येक घटकाच्या आर्थिक, सामाजिक उन्नतीसाठी राज्य सरकार, महापालिका कटिबद्ध आहे. महानगराच्या वाढत्या गरजा व आव्हाने लक्षात घेता लवकरच लाड पागे समितीच्या शिफारसींनुसार सुमारे ५०० लोकांना नियुक्तीचे आदेश निर्गमित केले जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. नागपूर महापालिकेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या महर्षी सुदर्शन वाल्मिकी वसाहत आणि प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी) अंतर्गत स्वप्नपूर्ती सदनिका प्रकल्पांच्या भूमिपूजन समारंभात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री ॲड्. आशीष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर, उपमहापौर श्रीमती लिला हातीबेड, स्थायी समितीच्या अध्यक्ष शिवानी दाणी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटनकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

महर्षी सुदर्शन वाल्मिकी यांच्या नावाने सफाई कर्मचाऱ्यांसाठी ही वसाहत उभी होणार असल्याने



वसाहतीच्या कामात कुठलीही कमतरता राहू नये याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिले. गरिबांच्या घराच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रधानमंत्री आवास योजना ही अत्यंत महत्त्वाची अशी योजना आहे. आगामी काळात सर्व विधानसभा क्षेत्रांत या योजनेची अंमलबजावणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुदर्शन वाल्मिकी समाजाचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचा हा प्रकल्प अत्यंत स्तुत्य असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. दोन्ही प्रकल्पांच्या माध्यमातून आठशे ते नऊशे कुटुंबांना हक्काची घरे मिळणार असून राज्य सरकारने त्याकडे विशेष लक्ष दिले आहे. समाजाने आता आधुनिक काळाच्या गरजा लक्षात घेऊन हॉस्पिटॅलिटीच्या क्षेत्रात पदार्पण करावे, छोट्या-छोट्या कंपन्या सुरु करुन सेवा पुरवाव्या आणि रोजगारांची निर्मितीही करावी, असे आवाहनही गडकरी यांनी यावेळी केले.

महापौर निता ठाकरे यांनी आपल्या प्रास्ताविकात या प्रकल्पाची माहिती दिली. उपमहापौर लिला हातीबेड यांनी राज्य सरकार व महानगर पालिकेच्या माध्यमातून समाजाच्या उन्नतीसाठी होत असलेल्या विशेष कामांचा यावेळी उल्लेख केला. सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर यांनी आपल्या मनोगतात या उल्लेखनीय विकास कामांबद्दल राज्य सरकार व महापालिकेचे आभार मानले. नागपूर महानगर पालिकेच्या वतीने मौजा नारी येथे साकारण्यात येत असलेल्या महर्षी सुदर्शन वाल्मिकी वसाहतीत सफाई कर्मचाऱ्यांसाठी एकूण १४ इमारतींमध्ये दोन बीएचकेच्या तब्बल ३९२ सदनिका उभारण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेच्या स्वप्नपूर्ती गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी परवडणाऱ्या किमतीत एक आणि दोन बीचएकेच्या एकूण ५१८ सदनिका उभारल्या जाणार आहेत. तीन वर्षात हे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या वसाहतीमध्ये उद्यान, पाणीपुरवठा, सोलर, खेळाचे मैदान, सुरक्षा असा सर्व प्रकारच्या दर्जेदार सुविधा उभारल्या जाणार आहेत.

# शाहिरी हे लोकसंस्कृतीचे वेद : इतिहास संशोधक व मोडी लिपी तज्ज्ञ मंदार लवाटे यांचे मत

■ पुणे (दै. संध्या)




ज्याप्रमाणे वेद हे आपल्या ज्ञानाचे भांडार आहेत त्याप्रमाणे शाहिरी हे लोकसंस्कृतीचे वेद आहेत. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे. आयुष्यात जे काही शिकता येईल ते शिकत राहा. प्रत्येक अनुभव आणि ज्ञानाचा प्रत्येक कण आपल्या आयुष्यात साठवत राहा. योग्य वेळी हेच ज्ञान आणि अनुभव आपल्या आयुष्यात निश्चितच उपयोगी पडतात, असे मत इतिहास संशोधक मंदार लवाटे यांनी व्यक्त केले. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी व डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'निरंतर पोवाडा प्रशिक्षण वर्गा'च्या ३० व्या वर्षाचा उद्घाटन सोहळा न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग येथील कलाग्राम दालनात झाला. या विनामूल्य पोवाडा वर्गाचे उद्घाटन इतिहास संशोधक व मोडी लिपी तज्ज्ञ मंदार लवाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ संकलक संजीव वेलणकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे होते यावेळी प्रबोधिनीच्या कार्याध्यक्ष प्राध्या. सौ. संगीता मावळे उपस्थित होत्या. मंदार लवाटे म्हणाले, इंटरनेटपूर्व काळात प्रत्येक मोठ्या घराण्यात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांची नोंद केली जात असे. त्या घरातील कर्ती व्यक्ती किंवा त्यांचे कारभारी या घटना लिहून ठेवत. त्यामुळे आज त्या नोंदी पुण्याच्या इतिहासातील महत्त्वाचे दस्तऐवज ठरल्या आहेत. प्रत्येक घटनेचे ऐतिहासिक महत्त्व ओळखून त्या जतन केल्या जात होत्या. आजही अनेक संशोधक वर्षानुवर्षे या नोंदींचा शोध घेऊन इतिहास जिवंत ठेवण्याचे कार्य करत आहेत. शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीचे मुख्य कार्य म्हणजे पोवाडा या लोककलाप्रकाराचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे होय. गेली ३० वर्षे निरंतरपणे विनामूल्य पोवाडा प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडविण्याचे कार्य प्रबोधिनी करत आहे. पोवाडा ही केवळ कला नसून, ती इतिहास, शौर्य, राष्ट्रप्रेम आणि संस्कार यांची परंपरा जपणारी लोककला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षदा इनामदार यांनी तर आभार प्रदर्शन सौ.प्रीती खोसे यादव यांनी केले.

# आमदार योगेश टिळेकर यांच्या मागण्यांना सरकारचा सकारात्मक प्रतिसाद

■ मुंबई (दै. संध्या)

पुण्यातील कोंढवा परिसरात वाढत्या गुन्हेगारी, बेकायदेशीर वास्तव्यासह अंमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवादी कारवायांशी संबंधित उघड झालेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेत भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांनी नियम९२अन्वयेकोंढव्याच्यासुरक्षेचागंभीर प्रश्न उपस्थित करत शासनाकडे तातडीने ठोस उपाययोजनांची मागणी केली. त्यांच्या मागण्यांची दखल घेत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सर्व मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. सभागृहात बोलताना आमदार टिळेकर यांनी कोंढव्यातील मिठानगर, कौसर बाग आणि परिसरातील काही भागांमध्ये संशयास्पद हालचाली उघड झाल्याचा उल्लेख केला. स्फोटक साहित्य तयार करण्यासाठी वापरल्या गेल्याचा संशय असलेल्या चार सदनिकांवर कारवाई करण्यात आली असून, गेल्या चार महिन्यांत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवरही कारवाई झाली आहे. तसेच अंमली पदार्थविरोधी पथकाने अफू आणि मेफेड्रोनसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.यावेळी त्यांनी मालेगावच्या धर्तीवर स्वतंत्र सुरक्षा कक्ष स्थापन करणे, कोंढवा पोलीस ठाण्यातील मनुष्यबळ वाढविणे, कबिरा, मिठानगर, शिवनेरी नगर आणि काकडे नगर येथे नवीन पोलीस चौक्या सुरू करणे, २४ तास पोलीस गस्त, राज्य राखीव पोलीस दलाची



मोबाईल सुरक्षा व्हॅन, प्रत्येक भाडेकरूची पोलीस पडताळणी आणि संपूर्ण परिसरात अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची ठोस मागणी केली. कोंढवा हा पुण्यातील झपाट्याने वाढणारा आणि मोठ्या लोकसंख्येचा परिसर आहे. त्यामुळे येथे नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. शासनाने या प्रश्नाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय म्हणून न पाहता राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहावे," असे आमदार टिळेकर यांनी सभागृहात स्पष्ट केले. उत्तरादाखल गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी कोंढवा परिसरात गरज भासल्यास विशेष कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येईल, नवीन पोलीस चौक्यांबाबत प्रस्ताव मागविण्यात येईल, मोबाईल सुरक्षा व्हॅन उपलब्ध करून देण्यात येईल तसेच आमदार टिळेकर यांनी मांडलेल्या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

# आपल्या चाहत्या बॉबी देओलला पाहण्यास विरारकरांची गर्दी

■ चाहत्यांचे प्रेम बघून बॉबी भारावून गेला

■ मुंबई (दै. संध्या)

कल्याण ज्वेलर्सने, विरारमध्ये आपल्या पहिल्या शोरूमचा भव्य शुभारंभ केला. महाराष्ट्रातील आपल्या रिटेल विस्तारातील एक मोठा टप्पा ब्रँडने गाठला आहे. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य सोहळ्यामध्ये श्री बॉबी देओल यांच्या हस्ते शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. अनेक मान्यवर पाहुणे आणि स्थानिक ग्राहक यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित असलेल्या उत्साही चाहत्यांना संबोधित करताना अभिनेता बॉबी देओल म्हणाले,"कल्याण ज्वेलर्सच्या विरारमधील पहिल्या शोरूमच्या उद्घाटनासाठी येथे उपस्थित राहून मला अत्यंत आनंद होत आहे. कल्याण ज्वेलर्सने गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्कृष्ट कारागिरीबद्दलच्या आपल्या अतूट वचनबद्धतेमुळे कोट्यवधी लोकांचा विश्वास जिंकला आहे. या महत्त्वाच्या समारोहामध्ये सहभागी होऊन मला खूप आनंद होत आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की विरारमधील ग्राहकांना ब्रँडची उत्कृष्ट कलेक्शन्स व जागतिक दर्जाचा खरेदीचा अनुभव खूप आवडेल."

विरारमध्ये कल्याण ज्वेलर्सचे नवे शोरूम सुरु झाल्यामुळे या भागातील ग्राहकांसाठी एक शानदार,




'वन-स्टॉप ज्वेलरी डेस्टिनेशन' (सर्व प्रकारचे दागिने एकाच ठिकाणी मिळण्याचे ठिकाण) उपलब्ध झाले आहे. या हाय-टेक आणि अत्याधुनिक शोरुमचे वातावरण आलिशान आहे. येथील दागिन्यांचे अतुलनीय कलेक्शन प्रत्येक ग्राहकाची आवडनिवड आणि गरज पूर्ण करते. सदाबहार पारंपरिक आणि लग्नाच्या दागिन्यां पासून ते आधुनिक, हलक्या वजनाची डिझाईन्स देखील या ठिकाणी मिळतील.

रमेश कल्याणरामन, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, कल्याण ज्वेलर्स म्हणाले,"महाराष्ट्र नेहमीच आमच्या सर्वात महत्त्वाच्या बाजारपेठांपैकी एक राहिला आहे. विरारमध्ये आमचे पहिले शोरूम सुरू करून आम्ही आमचे स्थान अधिक मजबूत करत आहोत, याचा आम्हाला खूप आनंद आहे. हा विस्तार दर्शवतो की, आम्ही या संपूर्ण परिसरातील ग्राहकांपर्यंत कल्याण ज्वेलर्सचा सर्वोत्तम अनुभव पोहोचवण्यासाठी तत्पर आहोत. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, हे नवीन शोरूम आमच्या ग्राहकांना दागिने खरेदीचा एक उत्कृष्ट अनुभव देईल, जिथे त्यांना अप्रतिम कलाकुसर, दागिन्यांचे खूप मोठे कलेक्शन आणि सर्वोत्तम सेवा एकाच छताखाली मिळतील."

# IIFL कामोठे शाखेकडून ३९९.२७ ग्रॅम सोन्याचा कथित बेकायदेशीर लिलाव

## ग्राहक आयोगाने बँकेला सेवा त्रुटी व अन्यायकारक व्यापार पद्धतीसाठी दोषी धरले

■ मुंबई (दै. संध्या)

कामोठे येथील रहिवासी प्रशांत दत्ताराम भुरुक यांनी IIFL (India Infoline Finance Ltd.) कामोठे शाखेविरोधात दाखल केलेल्या ग्राहक तक्रारीत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई उपनगर (वांद्रे) यांनी 25 जून 2026 रोजी एकतर्फी (Ex Parte) निर्णय दिला आहे.

प्रशांत भुरुक यांनी सांगितले की, त्यांनी मे 2022 मध्ये ॲड. मंगेश आरोते यांच्या मार्फत ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाचा अंतिम युक्तिवाद त्यांनी स्वतः आयोगासमोर केला. या प्रकरणाचा निर्णय अध्यक्षा सौ. समिंदरा आर. सुर्वे आणि सदस्य श्री. समीर एस. कांबळे यांनी दिला. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांनी मे 2020 मध्ये 399.27 ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांवर कर्ज घेतले होते. त्यानंतर फेब्रुवारी 2021 मध्ये ते कोविड-19 पॉझिटिव्ह आले व होम क्वारंटाईनमध्ये होते. या काळात कोणतीही पूर्वकल्पना, प्रभावी नोटीस किंवा कायदेशीर प्रक्रिया न पाळता बँकेने दागिने विकल्याचे नंतर सांगितले, असा त्यांचा आरोप आहे.

तक्रारदाराच्या मते, क्वारंटाईन संपल्यानंतर त्यांनी बँकेत जाऊन थकीत रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती. मात्र त्यांना दागिने आधीच विकल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी ग्राहक आयोगात दाद मागितली.

या प्रकरणात आयोगाने नमूद केले की, बँकेचे



प्रतिनिधी सुनावणीदरम्यान हजर राहिले नाहीत आणि त्यांनी लेखी उत्तरही दाखल केले नाही. त्यामुळे प्रकरण एकतर्फी (Ex Parte) चालविण्यात आले. निर्णयात आयोगाने IIFL ला "Deficiency in Service" (सेवेतील त्रुटी) आणि "Unfair Trade Practice" (अन्यायकारक व्यापार पद्धती) बाबत दोषी धरले आहे. तसेच, तक्रारदाराने न्यायालयाच्या आदेशानुसार संपूर्ण थकीत कर्ज, व्याज आणि इतर देय रक्कम भरल्यास 60 दिवसांच्या आत रक्कम भरून त्यानंतर 15 दिवसांच्या आत दागिने परत करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, तक्रारदाराचे म्हणणे आहे की आयोगाने काही महत्त्वाच्या बाबींचा पुरेसा विचार केला नसावा. विशेषतः, "विशेष बाब म्हणजे, ग्राहक आयोगाने IIFL ला 'Deficiency in Service' (सेवेतील त्रुटी) आणि 'Unfair Trade Practice' (अन्यायकारक व्यापार पद्धती) बाबत दोषी ठरविले असले, तरी संबंधित बँक अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही स्वतंत्र कारवाई करण्याचे निर्देश दिले नाहीत.

तसेच, कोविड काळात झालेला मानसिक त्रास, आर्थिक नुकसान आणि दीर्घकाळ न्यायालयीन लढा देऊनही तक्रारदाराला मानसिक छळ किंवा नुकसानभरपाई (Compensation) मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे तक्रारदाराने या निर्णयातील या भागाबाबत नाराजी व्यक्त केली असून, पुढील कायदेशीर पर्यायांचा विचार करत असल्याचे सांगितले आहे."त्या संदर्भातील परिस्थितीवर अधिक स्पष्ट निर्णय अपेक्षित होता, असे त्यांनी म्हटले आहे. प्रशांत भुरुक यांनी सांगितले की, ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून संपूर्ण थकीत रक्कम भरण्यास तयार आहेत आणि त्याबदल्यात 399.27 ग्रॅम सोन्याचे सर्व दागिने परत मिळावेत, अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यांनी IIFL ला आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. याशिवाय, ही न्यायालयीन लढाई सुरू झाल्यापासून स्वतःच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाटत असल्याने त्यांनी पोलिसांकडेही लेखी तक्रार दिल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे.

प्रकरणाचा पुढील टप्पा म्हणून तक्रारदार न्यायालयाच्या आदेशानुसार बँकेकडे थकीत रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू करणार असून, आदेशाची पूर्ण अंमलबजावणी होऊन दागिने परत मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## विक्रोळी पोलीस ठाण्यात मोफत आरोग्य शिबीर

मुंबई (दैनिक संध्या) : शनिवार दिनांक 11 जुलै 2026 रोजी विक्रोळी पोलीस स्टेशन येथे प्राध्यापक जीवन जाधव व फोर्टीस हॉस्पिटल यांच्यामार्फत मोफत आरोग्य शिबीर पोलिसांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी घेण्यात आले .या शिबिराचे आयोजन विक्रोळी पोलीस स्टेशन व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या उपाध्यक्षा डॉ.रश्मी जीवन जाधव यांच्यामार्फत करण्यात आले .या कॅंप मध्ये डॉ.सोनाली राणे चव्हाण , डॉ .रश्मी जीवन जाधव व फोर्टीज हॉस्पिटल यांची सर्व टीम आलेली होती . विक्रोळी पोलीस स्टेशन वरीष्ठ पोलिस निरीक्षक विक्रम चव्हाण यांचे डॉ.रश्मी जीवन जाधव यांनी स्वागत केले व शिबीर आयोजन बाबत सहकार्य केल्या बद्दल आभार मानले.

## महात्मा फुले विचारांचा महाराष्ट्रभर जागर करणार

मुंबई (दैनिक संध्या) : महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाला स्वाभिमान दिला, सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. शेतकरी-कष्टकरी आणि वंचित समाजाच्या न्यायासाठी संघर्ष केला. सत्यशोधनाचा मार्ग दाखवला. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या विचारांशी महात्मा फुले यांच्या कार्याची सांगड घालत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस वर्षभर राज्यभर जनजागृती अभियान राबविणार आहे. गावागावांत व्याख्याने, परिसंवाद, जनसंवाद, विद्यार्थी मेळावे आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचा प्रचार केला जाईल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित बहुजन कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. इतर मान्यवरांनीही या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना महात्मा फुले यांच्या विचारांमुळे, त्यांनी राबविलेल्या चळवळीमुळे मागासांना मुख्य प्रवाहात जागा मिळाल्याचे सांगितले. कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या विचारांवर आधारित राज्यव्यापी वैचारिक चळवळ उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार गावागावांत करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी वर्षभर सक्रियपणे काम करण्याचा संकल्प करण्यात आला.

## "मराठीवरून मुंबईची इमेज खराब करू नका

मुंबई (दैनिक संध्या) : राज ठाकरे हे महाराष्ट्राचे सक्रीय नेते आहेत. मराठीचा त्यांना अभिमान आहे. आम्हाला पण मराठीचा अभिमान आहे. हिंदीमध्ये बोलूच नका, असे सांगणे योग्य नाही. एखाद्या वेळेस बाहेरचे शिष्टमंडळ आले तर मराठीत बोलायचे का? उत्तर प्रदेश किंवा बिहार येथील उद्योगपती इथे आले, तर त्यांच्याशी मराठीत बोलणार का? परदेशातील एखादे शिष्टमंडळ मुंबईत आले, तर त्यांच्याशी मराठीत बोलणार का? अशी विचारणा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना केली. हिंदी बोलण्यावरून राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले. यानंतर आता विविध मुद्द्यांवर पत्रकारांशी बोलत असलेल्या रामदास आठवले यांना याबाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली. रामदास आठवले म्हणाले की, हिंदीमध्ये बोलू नका, हा राष्ट्रभाषेचा अपमान आहे. मराठीचा अभिमान असायला काही हरकत नाही. राज ठाकरे यांची मुले इंग्रजी माध्यमातून शिकली. राज ठाकरे जेवढे आक्रमक होतील, तेवढा आमचा फायदा आहे, राज ठाकरे कितीही आक्रमक झाले तरी, त्यांचे लोक निवडून येत नाहीत, आमचे लोक निवडून येत नाहीत, त्यांनी एवढ आक्रमक होऊ नये, असे रामदास आठवले यांनी सांगितले.

## कोलगावमधून फिरोज शेख ताब्यात

मुंबई (दैनिक संध्या) : शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माजी खासदार विनायक राऊत यांच्या सुनेने केलेल्या कथित जादूटोणा आणि अघोरी प्रथांच्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून, ठाणे पोलिसांनी सावंतवाडी पोलिसांच्या मदतीने सावंतवाडी तालुक्यातील कोलगाव येथून फिरोज आदम शेख यांना ताब्यात घेतले आहे. मात्र, या कारवाईनंतर आता या प्रकरणात एक नवा 'ट्विस्ट' आला असून, फिरोज शेख यांच्या नातेवाइकांनी वैयक्तिक वादातून ही कारवाई झाल्याचा संशय व्यक्त करत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### यश कॉम्प्युटर्समध्ये दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

नीरा (दैनिक संध्या) : नीरा (ता.पुरंदर) येथे दहावीच्या परीक्षेत ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यश कॉम्प्युटर्स, नीरा यांच्या वतीने गौरव करण्यात आला. तसेच एमएससीआयटी उन्हाळी बॅचच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन उत्साहात पार पडले. यावेळी महात्मा गांधी विद्यालयातील प्रथम क्रमांकाचा विद्यार्थी आर्यन धोंडे, द्वितीय क्रमांकाचा सक्षम मोरे, ज्योतिर्लिंग हायस्कूल, गुंजे येथील प्रथम क्रमांकाची विद्यार्थिनी प्रांजल राजत तसेच लि. रि. शहा कन्या विद्यालयातील आलिया पठाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला. एमएससीआयटी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाही ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना एमएससीआयटी अभ्यासक्रमातील आधुनिक अध्यापन पद्धती, डिजिटल शिक्षण आणि नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या एआय (AI) टूल्समुळे संगणक शिक्षण अधिक प्रभावी झाल्याचे सांगितले. यश कॉम्प्युटर्सच्या संचालिका जगदाळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व करिअरविषयी मार्गदर्शन केले, तर प्रकाश जगदाळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. त्रिशला गायकवाड यांनी केले, तर सौ. सीमा जगदाळे यांनी आभार मानले.




### रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी अमित बेनके तर सचिवपदी प्रसाद बांगर यांची निवड

जुन्नर (दैनिक संध्या) : रोटरी क्लब नारायणगावच्या रोटरी वर्ष 2026/27 साठी अध्यक्षपदी रो.अमित बेनके तर सचिवपदी रो.प्रसाद बांगर यांची सर्वानुमते निवड झाल्याची माहिती माजी अध्यक्ष रो.स्वप्निल जुन्नरकर यांनी दिली. नवनिर्वाचित अध्यक्ष अमित बेनके व सचिव प्रसाद बांगर यांचा पदग्रहण समारंभ ग्रामोन्नती मंडळ नारायणगावच्या वसंत व्हिला सभागृहात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रोटरी डिस्ट्रिक्ट नॉमिनी (DGN) रो.आर्किटेक्ट विवेक दिक्षित होते.यावेळी असिस्टंट गव्हर्नर(AG) डॉ.प्रज्ञा भवारी, जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके,ग्रामोन्नती मंडळ नारायणगावचे कार्याध्यक्ष कृषीरत्न अनिलतात्या मेहेर,विश्वस्त प्रकाशमामा पाटे,राजश्रीताई बेनके,तसेच रोटरी क्लब नारायणगाव,नारायणगाव हायवे,जुन्नर शिवनेरी,आळेफाटा,मंचर,राजगुरुनगर, चाकण,चाकण एअरपोर्ट,भोसरी आदि रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रो.आर्किटेक्ट विवेक दिक्षित,डॉ.प्रज्ञा भवारी,जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके,कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर,नूतन रोटरी अध्यक्ष अमित बेनके व माजी अध्यक्ष स्वप्निल जुन्नरकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन रोटरी क्लब नारायणगावचे सर्व सदस्य व फॅन्स यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत महाजन व अमृता भिडे यांनी केले तर आभार माजी सचिव प्रशांत ब्रम्हे यांनी मानले.

### शिव वैष्णव मिलनाचे जलरंगातून दर्शन



जेजुरी (दैनिक संध्या) : संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा सोमवार दिनांक 13 सुवर्ण नगरी जेजुरीत दाखल होत असताना शैव आणि वैष्णव परंपरांच्या ऐक्याचे दर्शन घडविणारे एक वैशिष्ट्यपूर्ण जलरंग चित्र कला शिक्षक अशोक नंदराज साबळे यांनी साकारले आहे. जेजुरी हे श्री खंडोबाचे पवित्र क्षेत्र असून वारकरी संप्रदायासाठी संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा हा भक्ती, समता आणि सेवाभावाचा उत्सव आहे. या पार्श्वभूमीवर श्री साबळे यांनी आपल्या कुंचल्यातून "हर–हरी मिलन" ही संकल्पना साकारली आहे. चित्रात एका बाजूला श्री खंडोबा आणि दुसऱ्या बाजूला श्री विठ्ठल हे परस्पर स्वागताच्या भावनेने एकमेकांकडे हात पुढे करताना दाखविले आहेत. भक्तिरसाने भारलेले वातावरण चित्रित केले आहे. हे चित्र कोणत्याही पंथाचे वर्चस्व दर्शवत नाही; उलट शिव आणि विष्णू यांच्या उपासनेतील ऐक्य, परस्पर सन्मान आणि महाराष्ट्राच्या समन्वयशील संतपरंपरेचा संदेश अधोरेखित करते. जेजुरीत पालखी आगमनाच्या वेळी अनुभवास येणारा शैव व वैष्णव भक्तांचा संगम या चित्रातून कलात्मक भाषेत व्यक्त करण्यात आला आहे. या चित्राविषयी बोलताना श्री अशोक नंदराज साबळे म्हणाले, "ही केवळ चित्रकला नसून संतपरंपरेला आणि जेजुरीच्या सांस्कृतिक वैभवाला माझ्या कुंचल्यातून अर्पण केलेली नम्र सेवा आहे.

# खाण्याच्या पानातून दिली जाणारी अपायकारक पावडर जप्त

**०३ दिवसांची पोलीस कोठडी**

शिक्रापूर (दै. संध्या)

मानवी आरोग्याशी खेळ करणाऱ्या अवैध व्यवसायाविरोधात शिक्रापूर पोलिसांनी पुन्हा एकदा धडक कारवाई करत मौजे केंदूर येथील पहाडमळा परिसरात छापा टाकून पानामध्ये मिसळून विक्रीसाठी ठेवलेली संशयित अपायकारक उग्र वासाची पावडर जप्त केली. या कारवाईत एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ०३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

गोपनीय माहितीवरून शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक कारंडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. दोन पंच, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि पोलीस कर्मचाऱ्यांसह पथकाने सायंकाळी केंदूर (पहाडमळा) येथे छापा टाकला. कारवाईदरम्यान तुषार राहुल पहाड (वय २६, रा. पहाडमळा, केंदूर, ता.शिरूर, जि. पुणे) याच्या घरामागील पत्राशेडची झडती घेतली असता, लाल रंगाच्या टेबलावरील बॉक्समध्ये प्लास्टिकच्या पिशवीत ठेवलेली पानामध्ये मिसळून खाण्यासाठी




वापरली जाणारी उग्र वासाची संशयित पावडर आढळून आली. ती व्यसनासाठी लोकांना पानामधून देण्यात येत होती. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी जागीच तपासणी केली. संशयित माल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. त्यातील १० ग्रॅमचे दोन नमुने रासायनिक विश्लेषणासाठी स्वतंत्रपणे सीलबंद करण्यात आले, तर उर्वरित ८५ ग्रॅम पावडर नियमानुसार सील करून ताब्यात घेण्यात आली. याप्रकरणी तुषार राहुल पहाड याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त करण्यात आलेला माल पुढील तपासासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. आरोपीस तत्काळ अटक करण्यात आली. प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी शिरूर यांच्यापुढे हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सोनवण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास शिक्रापूर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक अंकुश कारंडे, सोमनाथ कचरे , पोलिस अंमलदार धनंजय थेऊरकर विशाल देशमुख यांनी पार पाडली.

> खायचे पानामधून व्यसन करणे या मानवी आरोग्याशी खेळ करणाऱ्या अवैध प्रकारची माहिती मिळताच तातडीने धडक कारवाई केली जाईल. नागरिकांनीही अशी माहिती पोलिसांना निर्भयपणे द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.
>
> **- चंद्रशेखर यादव,पोलीस निरीक्षक**

## स्वच्छ वारी, सुंदर वारी': कऱ्हामाई फाउंडेशनच्यावतीने दिवे घाटात स्वच्छता मोहीम संपन्न



सासवड (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, कऱ्हामाई फाउंडेशनतर्फे आयोजित ‘स्वच्छ वारी, सुंदर वारी’ हा स्वच्छता उपक्रम रविवारी दिवे घाट माथा परिसरात उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक संस्था आणि नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमाचे हे सलग नववे वर्ष आहे.

पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी आणि परिसर पर्यावरणपूरक राखण्यासाठी स्वयंसेवकांनी दिवसभर स्वच्छता मोहीम राबवली. यावेळी घाट परिसरात साचलेला प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, चहाचे कप व इतर टाकाऊ वस्तू संकलित करून त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. स्वच्छता मोहिमेसोबतच वारकऱ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

या मोहिमेस संत सोपानकाका सहकारी बँक, आदर पूणावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह, सी वाय डी ए, राष्ट्र सेवा दल (पुणे जिल्हा), साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, शिवगर्जना मित्र मंडळ, मोरया मित्र मंडळ, शिवछत्रपती सोशल फाउंडेशन, भूमाता महिला ब्रिगेड, शिव चैतन्य अकॅडमी आणि मल्हार युवा प्रतिष्ठान यांसह अनेक संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. कऱ्हामाई फाउंडेशनचे सूरज कुंभार यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल सर्वांचे आभार मानले. दिवे घाटातील रस्त्यांच्या कामांमुळे निसर्गावर होणारा परिणाम लक्षात घेता, फाउंडेशनने गंभीर दखल घेतली आहे. "आम्ही लवकरच प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शासनाला अहवाल सादर करणार आहोत. घाटाचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखण्यासाठी आणि विकासकामे पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावीत, यासाठी आम्ही शासनाकडे आग्रही मागणी करणार आहोत," असे सूरज कुंभार यांनी स्पष्ट केले.



## नगदवाडी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

नारायणगाव (दै. संध्या)

नगदवाडी ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आल्याची माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. यावेळी इ.५ वी तील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीनी शरण्या कांबळे, शिष्यवृत्ती परीक्षेतील पात्र विद्यार्थी आरोही शिंदे, सर्वेश बढे, अंजली बढे, कृष्णाली शिंदे, रुद्र कुतळ, सादिया अन्सारी, दयानंद भोर तसेच नासा- इसरो प्रवेश परीक्षेतील पात्र विद्यार्थी मुस्कान शेख, रुद्र कुतळ, दयानंद भोर, आकाश राठोड तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षिका आशा आरेकर यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कांदळी गावचे शिक्षणप्रेमी माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे,ग्रामपंचायत सदस्य निलेश बढे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे, उपाध्यक्ष भावना बढे, अशोक बढे, रघुनाथ बढे, संगिता बढे, महेश बढे, संतोष बढे, दयानंद बढे, दिपाली जाधव, अक्षदा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर, पंडित चौगुले, निलेश शेलार, विद्या वाघ, उज्वला कांबळे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.

## दूध भेसळ प्रकरणात दोषींना पाठीशी नाही; कठोर कारवाईची भूमिका

मंचर (दै. संध्या)

**दिलीप वळसे पाटील यांचा इशारा**

बनावट दूध भेसळ प्रकरणात दोषी आढळणारी व्यक्ती किंवा संस्था कोणतीही असो, त्यांना पाठीशी घालणार नाही. दूध भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, ही आपली सुरुवातीपासूनच भूमिका असल्याचे राज्याचे माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी स्पष्ट केले. राजीनाम्याची मागणी करणाऱ्यांना नैतिक अधिकार नसल्याचा पलटवारही त्यांनी विरोधकांचे नाव न घेता केला. मंचर (ता. आंबेगाव) येथे रविवारी(ता.१२) आयोजित संवाद मेळाव्या'त ते बोलत होते. यावेळी म्हाडा गृहनिर्माण प्रकल्पाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील,राजेंद्र कोरेकर, विवेक वळसे पाटील, मानसिंग पाचुंदकर, स्वप्नील ढमढेरे, सुभाषराव मोरमारे, लक्ष्मण थोरात,शिवाजीराव ढोबळे, सुषमा शिंदे, विष्णू हिंगे, कैलासबुवा काळे,ज्योती पारधी, प्रकाश घोलप, प्रदीप वळसे पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्री संत सोपानकाका महाराज पालखी स्वागतासाठी माळेगाव बु. सज्ज : मुख्याधिकारी

बारामती (दै. संध्या)

श्री संत सोपानकाका महाराज पालखीचे माळेगाव बु. नगरपंचायत शहरात १७ जुलै २०२६ रोजी आगमन होणार असून पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी नगरपंचायत प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती मुख्याधिकारी बालाजी लोंढे यांनी दिली आहे. पालखी सोहळा येणाऱ्या वारकऱ्यांसाठी नगरपरिषदेच्यावतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता नगरपंचायत युद्धपातळीवर काम करत आहे. संपूर्ण पालखी मार्गावरील रस्त्यांचे खड्डे भरणे, रस्त्यांची स्वच्छता, धूर फवारणी, सार्वजनिक शौचालय दुरूस्ती व स्वच्छता आदी कामे करण्यात येत आहेत. शहरातील सर्व पथदिवे सुस्थितीत सुरू राहतील तसेच स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत दक्षता घेण्यात आली आहे. शहरातील हातपंप दुरूस्त करून विंधन विहिरींचे निर्जंतुकीकरण करण्याचे काम सुरु आहे. पालखी मार्गावरील स्वच्छतेचे काम नगरपंचायतीमार्फत सुरु असून १५ व १६ जुलै रोजी नगरपंचायत, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगाव बु. आणि पोलीस प्रशिक्षण अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियानाचे करण्यात येणार आहे.

नगरपंचायत कार्यालयाशेजारी पालखी विसाव्याच्या ठिकाणी असलेले मंडप, सेल्फी पॉइन्ट, आदी आवश्यक सर्व व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व दिंड्यांना टँकरने पाणी भरण्याकरिता जलशुद्धीकरण केंद्र, माळेगाव बु. नगरपंचायत याठिकाणी सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नगरपंचायत मार्फत आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ X ७ कार्यरत ठेवण्यात येणार आहे. तसेच हेल्पलाईन क्र.०२११२-२५४००१ कार्यान्वित करण्यात आला आहे.

> यंदाही ‘हरित वारी-सुरक्षित वारी’ हा उपक्रम राबविण्यात येणार असून याअंतर्गत पालखी मार्गावरील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपंचायतीचे संपूर्ण पदाधिकारी,अधिकारी-कर्मचारी वर्ग पालखी नियोजनसाठी काम करीत आहे. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयामार्फत शिबीर आयोजित करण्यात येणार असून सर्व वारकऱ्यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा. प्लास्टिक मुक्त, तंबाखुमुक्त शहर ठेवण्यासाठी व सुरक्षित पालखी सोहळ्यासाठी शहरातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष सुयोग सातपुते यांनी केले आहे.

# दौंड तालुका भक्तिरसात न्हाऊन निघाला



- ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या जयघोषात दौंड तालुक्यात संत तुकाराम महाराज पालखीचे भव्य स्वागत
- वारकऱ्यांच्या सेवेत लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ

यवत (दै. संध्या)

आषाढी वारीनिमित्त श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दौंड तालुक्यात आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या निनादात पालखीचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. हजारो वारकरी, भाविक, महिला, युवक आणि ग्रामस्थांनी भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभाग नोंदवत दौंड तालुक्याची वारकरी परंपरा पुन्हा एकदा जिवंत केली. यावेळी आमदार ॲड. राहुल कुल यांनी संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाचा कासरा हाती घेत संतचरणी आपली श्रद्धा अर्पण केली. त्यांनी वारकऱ्यांसमवेत काही अंतर पायी चालत वारीत सहभाग घेतला. त्यांच्या या सेवाभावी सहभागाचे वारकरी व उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. या प्रसंगी माजी आमदार रमेश थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या वैशाली नागवडे, जिल्हा परिषद सदस्य सागर शेलार, गायत्री खळदकर, अविनाश कुदळे, पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, हेमंत शेंडगे, रामभाऊ टुले, विठ्ठल खराडे, महावितरणचे अधिकारी अशोक जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पालखी मार्गावर ग्रामपंचायती, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपहार, वैद्यकीय मदत तसेच इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था केली होती. अनेक ठिकाणी फुलांची उधळण, आकर्षक रांगोळ्या, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि हरिनामाच्या वातावरणात पालखीचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले.

प्रशासनाच्या वतीने सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता आणि आरोग्य सुविधांचे प्रभावी नियोजन करण्यात आल्याने संपूर्ण पालखी सोहळा शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्राच्या संतपरंपरेचे आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक असलेल्या संत तुकाराम महाराजांच्या पालखीच्या स्वागताने दौंड तालुक्यात श्रद्धा, सेवा आणि समरसतेचा सुंदर संदेश दिला. वारकऱ्यांच्या सेवेसाठी ग्रामस्थांनी दाखविलेला उत्स्फूर्त सहभाग आणि लोकप्रतिनिधींनी जपलेली सेवाभावाची परंपरा यामुळे यंदाचा पालखी सोहळा अधिक भक्तिमय आणि संस्मरणीय ठरला.

## जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाचे उरुळी कांचनमध्ये भक्तिमय वातावरणात स्वागत

उरुळी कांचन (दै. संध्या)



जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे लोणी काळभोर येथून उरुळी कांचनमध्ये दुपारी पावणे दोन वाजता आगमन झाले. पालखी सोहळ्यातील पालखी रथ उरुळी कांचन येथील विसावा स्थळी पोहोचताच ग्रामस्थांच्या वतीने वाजत-गाजत, पुष्पवृष्टी करत आणि जयघोषाच्या गजरात भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

पालखी रथ विसावा स्थळी सुमारे सव्वा तास थांबला. या कालावधीत उरुळी कांचनसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले. त्यानंतर दुपारी तीन वाजता पालखी सोहळा पुढील मुक्कामासाठी यवतच्या दिशेने मार्गस्थ झाला. पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी उरुळी कांचन ग्रामपंचायतीच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. वारकरी महिला व बालकांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात आला होता. तसेच वारकऱ्यांना तातडीचे आरोग्य उपचार मिळावेत यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून चार ठिकाणी आरोग्य बूथ उभारण्यात आले होते. या ठिकाणी आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी वारकऱ्यांची तपासणी करून आवश्यक प्रथमोपचार केले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची माहिती देण्यात आली. यामध्ये पीक विमा योजना, शेती उपयोगी मार्गदर्शन आणि शासनाच्या इतर योजनांची माहिती वारकऱ्यांना व नागरिकांना देण्यात आली.

पालखी सोहळ्यानिमित्त विविध सामाजिक संस्था व संघटनांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घेतला होता. श्रमिकराज व श्री चिंतामणी सहकारी संघटनेच्या वतीने सुमारे पाच हजार भक्तांसाठी वडापावचे वाटप करण्यात आले. तसेच भक्तिमय वातावरण निर्मितीसाठी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. कस्तुरी ग्रुपच्या वतीने दहा हजार भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यासोबतच उसाचा रस, पिण्याचे पाणी आणि पाण्याचे टँकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. उरुळी कांचनमधील अनेक संस्था, मंडळे आणि संघटनांनी वारकऱ्यांसाठी अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन करून सेवा बजावली.